बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

## हा माझा शेवटचा प्रयत्न

कोलकत्ता: पश्चिम बंगालच्या कोलकाता येथील आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात झालेल्या बलात्कार आणि हत्या प्रकरणी डॉक्टरांनी आंदोलन पुकारले आहे. डॉक्टरांच्या समस्यांचं निराकरण आणि आरोपीला शिक्षा करण्याची मागणी आंदोलकांकडून केली जातेय. या आंदोलनामुळे रुग्णसेवेवर परिणाम झाला आहे. त्यामुळे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आंदोलकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत आहेत. काल रात्रभर पावसातच आंदोलकांनी आंदोलन केल्याने आज ममता बॅनर्जी यांनी पुन्हा एकदा आंदोलकांची भेट घेतली.गुरुवारी ममता बॅनर्जी यांनी आंदोलकांशी चर्चा करण्यासाठी बैठकीचं आयोजन केलं होतं.

बीड | रविवार,दि.१५ सप्टेंबर २०२४ | वर्षे४२ | अंक४५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## कला केंद्राच्या नावाखाली वेश्या व्यवसाय!

सत्यता: केज तालुक्यात अनेक लॉजचे मालक मालामाल



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज मांजरसुम्बा ते केज दरम्यान तीन कला केंद्र आहेत सध्या केज तालुक्यात अवैद्य धंद्याने उच्छाद मांडला आहे दारू मटका लॉजवरील वेश्या व्यवसाय आणी हे कला केंद्र लोकनाट्य कलेच्या नावाखाली सरळ वेश्याव्यवसाय करून घेतला जातो अल्पवयीन मुलीकडुन डान्स करून घेतला जातो बठकीत शौकीन लाखो रुपयांची उधळपट्टी करतात या नादा पायी अनेक ग्राहकांचा संसार मोडला यात सर्व वयातील ग्राहक जातात त्यात तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर व्यसनात अडकला आहे यासाठी पैसा कमावण्यासाठी वाम मार्गाने पैसा कमवत आहेत तालुक्यातील तीन तरुणांनी मध्ये महाराष्ट बँकेतून ऑनलाइन पद्धतीने पन्नास लाख रुपयांची चोरी केली होती हा सर्व पैसा या कला केंद्रा मध्ये

पान २ वर...

# देशभर उमटले आरक्षण वक्तव्याचे पडसाद!

## राजकारण: मोदींची काँग्रेसवर सडकून टीका!

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुल गांधी यांनी अमेरिका दौऱ्यात असताना भारतातील आरक्षणाच्या मुद्द्याविरोधात वक्तव्य केलं होतं. त्यावरून देशभरातून त्यांच्याविरोधात संताप निर्माण झाला होता. आता यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर टीका केली आहे. एवढंच नव्हे तर त्यांनी जवाहरलाल नेहरू, राजीव गांधी, इंदिरा गांधी यांच्यासह संपूर्ण काँग्रेसवरच टीकास्त्र डागलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हरियाणातील कुरुक्षेत्र येथे बोलत होते.पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, देशाचे पहिले पंतप्रधान आणि राहुल गांधी यांचे पणजोबा जवाहरलाल नेहरू म्हणाले होते की नोकऱ्यांमध्ये लोकांना आरक्षण दिल्यास सरकारी सेवांचा दर्जा बिघडेल. नेहरुंनी आरक्षणाला विरोध करणाऱ्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले होते. याचे पुरावेही सापडतील.



### काँग्रेस म्हणजे शहरी नक्षलवाद

ते पुढे म्हणाले, आम्ही काँग्रेस सरकारचा तो काळ पाहिला आहे जेव्हा विकासासाठी फक्त एका जिल्ह्यापुरता मर्यादित असायचा. परंतु, भाजपाने समन्यायी पद्धतीने विकासकामे केली आहेत. काँग्रेसचे राजकारण देशात खोटेपणा अराजकता पसरवण्याइतपत खालावले आहे. आजची काँग्रेस हे शहरी नक्षलवाद बनले असून खोटे बोलण्यात त्यांना अजिबात लाज वाटत नाही, अशी सणसणीत टीकाही नरेंद्र मोदी यांनी केली.

### आरक्षण घेतलेल्यांना नेहरू बुद्धू म्हणत

ते पुढे म्हणाले, गांधी कुटुंबांनी नेहमीच ओबीसी, दलित आणि आदिसावींचा अपमान केला आहे. नेहरु पंतप्रधान असताना त्यांनी आरक्षणाला विरोध केला होता. त्यांनी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले होते. त्याचे पुरावेही आहेत. इतकंच नव्हे तर आरक्षण असलेल्या लोकांना नोकऱ्या मिळाल्या तर सरकारी सेवांचा दर्जा खालावेल, असंही नेहरूजी म्हणाले होते. इंदिरा गांधी आल्या तेव्हा त्यांनीही ओबीसी आरक्षणाला स्थगिती दिली होती. राजीव गांधींनीही आरक्षणाला विरोध केला होता. एका मुलाखतीत त्यांनी आरक्षण मिळवलेल्या लोकांना बुद्धू असं संबोधलं होतं, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

## मराठा आरक्षण नेत्याविरोधात व्यक्तव्य!

चर्चेतले: छगन भुजबळ यांचा गंभीर आरोप!



### मराठा आरक्षणाची स्थिती काय?

एखाद्या जाती-जमातीला मागास ठरवून आरक्षण देण्याचा अधिकार केंद्र किंवा राज्य सरकारऐवजी राष्ट्रपतींना देणारी १०२वी घटनादुरूस्ती सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द करताना वैध ठरवली. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, १०५वी घटनादुरूस्ती करण्यात आली. परंतु, या घटनादुरूस्तीने राज्य सरकारला केवळ एखाद्या जाती-जमातीचे मागासलेपण तपासण्याची आणि त्याबाबतची माहिती गोळा करण्याचे मर्यादित अधिकार दिले आहेत. असे असताना त्याचा चुकीचा अर्थ लावून आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्याबाबतचा कायदा केला, असा दावा मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयात केला.

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचं घोंडगं अद्यापही भिजत आहे. आंदोलक मनोज जरांगे पाटलांनी मराठा आरक्षणाचा मुद्दा लावून धरलाय. मात्र, सरकारपक्षातील छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणाला विरोध दर्शवला असून आंदोलक मनोज जरांगे यांच्यावरही सातत्याने गंभीर आरोप केले आहेत. मराठा आरक्षणासाठी चालू असलेले आंदोलन हे शरद पवारांनी सुरू केल्याचा आरोप छगन भुजबळ यांनी यापूर्वीही केला होता. आता त्यांनी रोहित पवार आणि राजेश टोपेंचं नाव घेऊन मनोज जरांगेंवर टीका केली आहे. माध्यमांशी बोलताना त्यांनी ही टीका केली.मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला ज्यावेळेला सुरुवात झाली, दगडफेक झाली, लाठीमार झाला त्यावेळेला माझ्या माहितीप्रमाणे जरांगे तिथून निघून गेला होता. रात्री २ वाजता राष्ट्रवादीच्या दोन आमदारांची नावे पुढे आली. रोहित पवार आणि राजेश टोपेंनी तिथे पुन्हा आणून बसवलं. मग पवार साहेब तिथे गेले. उद्धव ठाकरेही गेले. खरी माहिती शरद पवार आणि उद्धव ठाकरेंनाही माहिती नव्हती, असं छगन भुजबळ म्हणाले.पोलिसांवर दगडफेक झाली. ८० महिला आणु पुरूष पोलीस कर्मचारी हॉस्पिटलमध्ये दाखल झाले होते. नंतर स्वतःच्या संरक्षणासाठी हा लाठीहल्ला करण्यात आला. हे दोन्ही नेते गेल्यामुळे

पान २ वर...

## दिघेंच्या आनंद आश्रमात पैशांची उधळपट्टी

चर्चा: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेणार निर्णय



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख दिवगंत आनंद दिघे यांच्या टेंभी नाक्यावरील आनंद आश्रमात शिंदेच्या शिवसेनेचे काही पदाधिकारी नोटा उधळतानाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यावरून आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. याप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित पदाधिकाऱ्यांना पक्षातून काढून टाकण्यात येणार असल्याचं ते म्हणाले.स्व. आनंद दिघेंच्या घरात भिंतीवर एक हंटर लावलेला होता. काल आनंद आश्रमात झालेला धिंगाणा आनंद दिघेंनी पाहिला असता तर भिंतीवरील हंटर काढून त्यांनी लुटीचा पैसा उधळणाऱ्यांना फोडून काढलं असतं. जे स्वतःला आनंद दिघेंचा वारसादार मानतात, त्यांना आम्ही सांगू इच्छितो की, हा आनंद दिघेंचा वारसा नाही. आनंद दिघे अशाप्रकारच्या लोकांचे कधीच समर्थन करत नसत. बारमध्ये ज्या प्रकारे पैसे उधळावेत, त्या पद्धतीने आनंद आश्रमात पैसे उधळले गेले, अशी टीका शिवसेना उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी केली.आनंदआश्रमतील प्रकरणावरून एकनाथ शिंदे म्हणाले, मी ते पाहिलं. त्याची चौकशी होईल. ज्याने असा प्रकार केलाय त्याला पक्षातून काढून टाकणार. त्याच्यावर कारवाई करणार.आश्रमात पैसे उडविणारे शिवसैनिक बारमध्ये जाणार होते, म्हणूनच त्यांनी त्यापद्धतीप्रमाणे पैसे उधळले, असा आरोप उबाठा गटाचे आमदार वैभव नाईक यांनी केली. स्व. आनंद दिघेंनी त्याकाळी बार फोडून

पान २ वर...

## खाद्यतेलावरील आयात शुल्कही वाढवले

निर्णय: धनंजय मुंडेंनी मानले केंद्र सरकारचे आभा



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयाबीनची ९० दिवसांनी हमीभावाने खरेदी करण्याच्या निर्णयापाठोपाठच केंद्र सरकारने खाद्य तेलावरील आयात शुल्क २० टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीनला चांगला भाव मिळेल असा विश्वास कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला असून या निर्णयाबद्दल त्यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

राज्यात सोयाबीनचा पेरा ५२ लाख हेक्टर पेक्षा जास्त झाला असल्याने तसेच यावर्षी पाऊस पाणी व्यवस्थित झाले असल्याने सोयाबीनचे उत्पन्न बंपर होणार आहे. अशावेळी शेतकऱ्यांच्या सोयाबीनला योग्य भाव मिळावा यासाठी कृषी मंत्री धनंजय मुंडे हे सातत्याने प्रयत्न करीत असून त्या दृष्टिकोनातून त्यांनी केंद्र शासनाकडे सोयाबीनची हमीभावाने खरेदी करावी, खाद्यतेल, सोया मिल्क, सोया केक इत्यादी

पान २ वर...

# पराभवास कारणीभूत असलेल्या आ.नमीता!

डावलून:विडा सर्कलमध्ये लावला उदघाटनाचा सपाटा



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड लोकसभा निवडणूकीत पंकजाताई मुंडेच्या परावभास कारणीभूत असलेल्या आ. नमिता मुंदडा यांनी येणारी विधानसभेची निवडणुक समोर ठेवून विडा सर्कल मधील भाजपाच मतदान आपल्याला मिळावे म्हणून विडा येथील मोठी लोकसंख्या असलेल्या गावात व वाडी वस्त्यावर उध्दघाट्न करण्याचा सपाटा लावला आहे. या उध्दघाटन कार्यक्रमाला विडा जि.प सर्कल मधील आजी-माजी भाजपा जेष्ठ कार्यकर्त्यांना डावलून व बाहेरच्या सर्कल मधील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन आ. नमीता मुंदडांनी उध्दघाटने शुक्रवारी केली आहेत.लोकसभेच्या निवडणूकीत भाजपा कडून बीडची उमेदवारी पंकजाताई मुंडे यांना दिली होती. लोकसभेच्या प्रचारावेळी बीड असता मराठा आरक्षण प्रश्नाचा गंभीर बनला होता. आष्टी पाटोदा, गेवराई, माजलगांव, परळी मतदार संघातील आमदार मंडळी पंकजाताई खासदार झाल्या पाहीजेत काम करत होते. केजच्या आमदाराचे सासरे नंदकीशोर मुंदडा यांना मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी गावाच्या बाहेर जाण्यास भाग पाडले होते. म्हणून केजच्या आ. नमिता मुंदडा यांनी मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांच्या धास्तीने त्या केज मतदार संघातील मतदारा पर्यंत पोहचू शकल्या नाहीत त्यामुळे पंकजाताई मुंडेंचा लोकसभेच्या निवडणूकीत पराभव झाला हे वंजारा समाजाचे मतदार आयुष्यभर विसणार नाहीत.लोकसभेच्या निवडणूकीत पंजाताईचा पराभव झाल्यामुळे काही तरुणांनी आत्महत्या देखील केल्या आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर ऐनवेळी राष्ट्रवादी पक्षातून हळूच उडी मारुण भाजपा पक्षात प्रवेश केलेल्या नमिता मुंदडाना आमदार करण्यासाठी केज विधान मतदार संघात भाजपाचा बालेकिल्ला असलेल्या विडा जि.प. सर्कल मधील आजी माजी भाजपा जेष्ठ कार्यकर्त्यांनी २०१९

पान २ वर...

बोंबला | गेवराई बसस्थानकाचे थातूरमातूर काम

## नियम डावलून साडेतीन कोटीचे काम!




गेवराई/ पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या , बीड बांधकाम विभागाच्या अंतर्गत करण्यात येत असलेल्या साडे तीन कोटी रुपये खर्चाच्या कामामध्ये नियमांना डावलून, संबंधित कंत्राटदारांकडून थातूरमातूर काम करण्याचा घाट घातला जात असून, या कामाची चौकशी करून, कंत्राटदारांकडून दर्जेदार काम करून घ्यावे; नसता आंदोलन करण्यात येईल असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

गेवराई येथील बसस्थानक आणि परिसरात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बांधकाम विभागाकडून सिमेंट काँक्रिट रस्ता, फरशी व अन्य कामे करण्यात येत आहेत.जूलै २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्य, सार्वजनिक बांधकाम विभागाने नोटिफिकेशन जाहिर करून , जवळपास साडेतीन कोटी रुपयाच्या कामाचे टेंडर काढले होते. त्या नुसार, गेवराई बसस्थानकावर संबंधित कंत्राटदारांने कामाला सुरुवात केली आहे.मात्र, कामाचा दर्जा न ठेवता, कंत्राटदार काम करत आहे. बसस्थानकावर जिथे बस उभ्या राहतात, त्या ठिकणी कोणतेही खोदकाम न करता सिमेंट काँक्रिट चा चार इंच थर अंथरला आहे. या कामात वाळू न वापरता दगडी बुकटी डस्ट वापरली जात आहे.वास्तविक पाहता, सिमेंट काँक्रिट करायच्या आधी, तो परिसर उकरून तिथे खडी अंथरायची आहे. असे काहीही न करता, थेट मातीवरच सिमेंट काँक्रिट टाकून काम केले जात असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. जीएसबीचा थर न

पान २ वर...

## आंदोलनाची धग अजूनही सुरुच

संतप्त: आंदोलनकर्त्या डॉक्टरांवर बॅनर्जी भडकल्या?




कोलकत्ता/पुण्यभूमी प्रतिनिधी

कोलकाता येथील आर. जी. कर महाविद्यालय आणि रुग्णालयात ९ ऑगस्टला एका डॉक्टर तरुणीवर बलात्कार झाला आणि तिची अत्यंत क्रूर पणे हत्या करण्यात आली. या प्रकरणानंतर सुरु झालेली आंदोलनं अद्यापही थांबलेली नाहीत. डॉक्टरांनी सुरु केलेली ही आंदोलनं थांबावीत यासाठी ममता बॅनर्जी यांनी आर. जी. कर महाविद्यालयाला भेट दिली. सरकार तुमच्या पाठिशी आहे असं ममता बॅनर्जी त्यांना म्हणाल्या. या प्रकरणातला आरोपी संजय रॉयला पोलिसांनी अटक केली आहे. तसंच हे प्रकरण आता सीबीआयकडे वर्ग करण्यात आलं आहे.ममता बॅनर्जी यांनी आज आर. जी. महाविद्यालय आणि रुग्णालयात जे आंदोलन करत आहेत त्या सगळ्या डॉक्टरांची, ट्रेनी डॉक्टरांची भेट घेतली. या प्रकरणात जे जे दोषी असतील त्यांना आम्ही कठोर शासन करु असं आश्वासन ममता बॅनर्जींनी आंदोलनकर्त्या

पान २ वर...

## उजवा डावा!

''मी वेद वाचलेले आहेत. पुराणे वाचलेली आहेत. विविध धर्मशास्त्रे वाचलेली आहेत आणि म्हणूनच मी साम्यवादी झालेलो आहे'', असे ठासून सांगण्यासाठी आवश्यक बौद्धिक उंची आणि खोली असलेल्या सीताराम येचुरी यांच्या जाण्याने आपण नक्की काय गमावले हे कळण्यासाठीदेखील किमान गुणवत्ता हवी. एरवी 'एक नेता गेला' इतकाच त्याचा अर्थ. अलीकडे एका राज्यात जन्मास येऊन अन्य भाषक समूहांत, देशभर सर्वदूर प्रभाव निर्माण करणारे नेते दुर्मीळच. बहुतांश नेतागणांची धाव फार फार तर एका राज्यापुरतीच. हे वास्तव लक्षात घेतल्यास सीताराम येचुरी यांच्यासारख्या मोजक्यांचे महत्त्व ध्यानात येईल. जन्म तेलुगू ब्राह्मण कुटुंबात पण शिक्षण तमिळनाडूत, केंद्रीय शालान्त मंडळाच्या परीक्षेत देशात सर्वप्रथम येण्याइतकी बुद्धिमत्ता, उच्च शिक्षण दिल्लीत, कार्यक्षेत्र पश्चिम बंगाल, केरळ आणि त्रिपुरा, इंग्रजी फर्डे पण त्याच वेळी हिंदी, तेलुगू, तमिळ, मल्याळम आणि बंगाली या भाषांवरही तितकेच उत्तम प्रभुत्व आणि या सर्व भाषांत सहज वक्तृत्व. फक्त या इतक्या गुणांसाठीही सीताराम येचुरी मोठे ठरले असते. याचे कारण इतके सारे गुण एका राजकीय व्यक्तीत आढळणे राहिले दूर, सध्या आपले बरेचसे नेतृत्व निव्वळ भरताड आणि यातील एकही गुण अंगी नसलेले असते. या मुद्द्यावर सीताराम येचुरी यांची तुलना जॉर्ज फर्नांडिस यांच्याशी होऊ शकेल. जन्म कारवारचा, कार्यक्षेत्र बिहार, राजकीय भूमी मुंबई आणि प्रभावक्षेत्र देश असलेले फर्नांडिस आणि येचुरी यांच्यात बरेच साम्य आढळेल. असे खऱ्या अर्थाने भारतीय असलेले नेते आताशा निपजत नाहीत याबद्दल शोक व्यक्त करून येचुरी यांचे मोठेपण समजून सांगणे आवश्यक.याचे कारण ते केवळ डावे होते, इतकेच नाही. तसे वा त्यांच्यापेक्षाही कडवे डावे अन्यही काही आढळतील. डावे असोत वा उजवे. यातील बहुतांशांनी आपल्या–आपल्याच विचारधारेचा अभ्यास केलेला असतो. खरे तर त्यास अभ्यास म्हणणेही अयोग्य ठरेल इतपत पोपटपंची हे सर्वसामान्य डावे वा उजवे करत असतात. पण अन्य विचारधारा समजून घेऊन, त्या विचारधारांचा सम्यक अभ्यास करून स्वत:ची बैठक बनवणारे फार थोडे. सीताराम येचुरी या अशा मोजक्यांतील मेरुमणी. त्यामुळेच मार्क्सवाद्यांत सर्रास आढळणारा तुच्छतावाद त्यांच्या ठायी अजिबात नव्हता. आपले बरेच डावे हे आताआतापर्यंत मॉस्को अथवा बीजिंगकडे पाहून बोलत. येचुरी यांनी असे परदेशी पाहणे फारच लवकर सोडले. म्हणूनच डावे असूनही त्यांनी स्वत:स नक्षलवादी चळवळीपासून चार हात दूर ठेवले आणि मार्क्सवादाच्या पलीकडे जात देशी वर्गविग्रह समजून घेतला. त्यांची राजकीय भूमिका वेगळी ठरते ती यामुळे. आपल्या राजकीय इतिहासात पोथीनिष्ठ डावे आणि राममनोहर लोहियांचे समाजवादी अनुयायी इतके वैचारिक आंधळे होते की त्यांनी काँग्रेसला विरोध करण्यासाठी प्रसंगी भाजपशी हातमिळवणी करण्याइतकी वैचारिक बदफैलीगिरी केली. हरकिशन सुरजित यांच्यापासून डाव्यांच्या एका गटास भान यायला सुरुवात झाली. सीताराम येचुरी हे सुरजित यांचे पट्टशिष्य. त्याचमुळे नरसिंह राव यांच्या पराभवानंतर एच. डी. देवेगौडा, इंदरकुमार गुजराल यांना पंतप्रधानपदी बसवण्यास आवश्यक राजकीय आघाड्या स्थापण्याची लवचीकता त्यांनी दाखवली. त्या वेळी पडद्यामागील सूत्रधारांत येचुरींची भूमिका मोठी होती. त्याआधी विश्वनाथ प्रताप सिंग यांना भाजपबरोबरीने पाठिंबा देऊन काय होते हे देशाने अनुभवले होते. त्यामुळे वैचारिक मध्यबिंदूच्या डावीकडील सर्वांस एकत्र कसे बांधता येईल असा सुरजित यांचा प्रयत्न असे. तीच भूमिका येचुरी यांनी पुढे नेली.

# ... आणि बुध्दीजीवी हरपला!

सिताराम येच्युरी जरी मार्क्सवादी कम्युनिस्ट म्हणजे डाव्या विचारसरणीचे असले तरी देशाने एक बुध्दीजीवी गमावला आहे.विचारसरणी डावी –उजवी –आडवी –उभी यापेक्षा विवेकी किती?हे महत्त्वाचे आहे. केवळ एका थोतांड विचारसरणीशी ज्याचा मानवाच्या कल्याणासाठी कुठल्या कुठे काडीचाही संबंध नाही अशी विचारसरणी असलेले बुध्दीजीवी कमी नाहीत नव्हते.पण, संविधानावर प्रखड निष्ठा असलेला आणि डोळस विचार माडणारा नेता,लेखक म्हणजे सिताराम येच्युरी.अगदी विद्यापाठीय नेतृत्वापासून ते भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या पॉंलिटी ब्युरो सदस्यांपर्यंत त्यांची ओळख कधीही न पुसणारी डाव्या चळवळीत स्वतः ला झोकून दिले आणि त्याच चळवळीत अखेरचा श्वास घेतला. खरं तर कम्युनिस्ट म्हटले की,मोडेल पण वाकणार नाही.कायम पक्षाचा एक व्यक्ती ठामपणे कम्युनिस्ट विचारसरणीचे समर्थन करतो.हे वेगळं सांगण्याची गरज नाही. कम्युनिस्ट एकनिष्ठ असे यमकच या कार्यकर्त्यांना लावावे.अगदी सिताराम येच्युरी त्याच एकनिष्ठतेचे धनी. कम्युनिस्ट पक्ष आज बियापुरता उरला असला तरी ते पेरण्यासाठी अजून बियाण आहे हे प्रत्येक कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून शिकता येईल.एरव्ही इतर विचारसरणीत आयात निर्यात सुरूच असते.हे ही काही नव नाही.पण, कम्युनिस्टांच्या बाबातीत थोडा विचार करावा लागेल. खरं तर सिताराम येच्युरी सतत राजधानी दिल्लीच्या गराड्यात असतं.पण, संसदेत मात्र अभ्यासू बोलणं त्यांना देशातील कानाकोपऱ्यात घेऊन जातं.सिताराम येच्युरी यांची कर्मभूमी दिल्ली म्हणावी. बोलण्यात कुठेच आक्रमकणा, अक्राळस्ताळेपणा नाही.मुद्देसूद आणि परखडपणे त्यांची देशातील कोणत्याही विषयावर मांडणी त्यांची बुद्धीमत्ता आणि अभ्यासू वृत्ती दिसून येते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने एक मार्गदर्शक गमावला तर देशाने एक अभ्यासक गमावला आहे. कम्युनिस्ट पक्षाचा देशातील चढता आलेख आणि याच पक्षाला लागलेली उतरती कळा त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत पाहिली. त्यांच्या निधनानं कम्युनिस्ट



पक्षाचा एक बुद्धिजीवी चेहरा हरपला आहे. सीताराम येचुरी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव होते. त्यांनी अतिशय कणखरपणे अन्याय अत्याचार आणि देशातील महत्वाच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवला.त्यामुळे हे केवळ कम्युनिस्टांचे नुकसान नाही तर संबंध देशाचे नुकसान आहे.एखादा व्यक्ती त्या त्या संस्थेपुरता, पक्षापुरता किंवा संघटनेपुरता मर्यादित असतो त्याचे त्याकरिता अतुलनीय योगदान त्याची हानी त्या पक्षासाठी किंवा हयातीत कर्तृत्व त्या त्या संस्थेपुरते, पक्षापुरते किंवा संघटनेपुरते पण याला अपवाद मात्र काही बोटावर मोजता येतील इतकेच.की ज्यांच्यामुळे देशाची हानी असते.सतत संविधानिक मुल्याकरिता सिताराम येच्युरी लढत राहिले. संविधानिक हक्क अधिकार यासाठी ते सतत संघर्षरत राहिले.ते प्रत्येक नागरिकाला मिळविण्यासाठी त्यात अमुक तमुक व्यक्तीकरिता लढले. त्यांचा संघर्ष संविधानिक हक्कांसाठी आणि अधिकारासाठी होता. हेही वेगळे सांगण्याची गरज नाही. सतत दिल्लीत वावरणारा नेता संबंध देशाचा होतो ते संविधान हक्कांसाठी लढणारा असल्याने.१२ ऑगस्ट १९५२ रोजी जन्मलेल्या सिताराम येच्युरी यांचे निधन १२ सप्टेंबर २०२४ झाले . भारतीय मार्क्सवादी राजकारणी आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (मार्क्सवादी) सरचिटणीस ते १९९२ पासून सीपीआय (एम) च्या पॉलिट ब्युरोचे सदस्य होते.२००५ ते २०१७ पर्यंत पश्चिम बंगालमधून राज्यसभेचे खासदार राहिले. १९७८ मध्ये, येचुरी यांची विद्यार्थीदशेत असताना एस एफ आय च्या अखिल भारतीय सहसचिव म्हणून निवड झाली आणि पुढे ते एस एफ आयचे अखिल भारतीय अध्यक्ष बनले. ते एस एफ आयचे पहिले अध्यक्ष होते जे केरळ किंवा बंगालचे नव्हते.अन्यथा या पदावर सतत याच राज्यातील व्यक्ती अध्यक्ष राहिले आहेत.१९८४ मध्ये त्यांची सीपीआय (एम) केंद्रीय समितीवर निवड झाली. १९८५ मध्ये, पक्षाच्या घटनेत बदल करण्यात आला आणि एक पाच सदस्यीय केंद्रीय सचिवालय निवडण्यात आले, ज्यामध्ये तरुण दिग्गजांचा समावेश होता – ते, प्रकाश करात , सुनील मोईत्रा, पी. रामचंद्रन आणि एस. रामचंद्रन पिल्लई – पॉलिटब्युरोच्या निर्दे



**पदमाकर उखळीकर,**
मो.९९७५१८८९१२

श आणि नियंत्रणाखाली काम करण्यासाठी निवडला. सिताराम येच्युरी यांनी १९८६ मध्ये एस एफ आय सोडले. त्यानंतर १९९२ मध्ये ते चौदाव्या काँग्रेसमध्ये पॉलिट ब्युरोमध्ये निवडून आले आणि १९ एप्रिल २०१५ रोजी विशाखापट्टणम येथे पक्षाच्या २१ व्या पक्ष काँग्रेसमध्ये सीपीय (एम)चे पाचवे सरचिटणीस म्हणून निवडून आले . ते आणि पोलिटब्युरो सदस्य एस. रामचंद्रन पिल्लई हे या पदासाठी आघाडीवर होते पण पिल्लई यांनी माघार घेतल्याने त्यांची एकमताने निवड करण्यात आली. ते २००५ ते २०१५ पर्यंत सलग तीन वेळा या पदावर राहिलेल्या प्रकाश करात यांच्यानंतर आले . एप्रिल २०१८ मध्ये हैदराबाद येथे झालेल्या २२ व्या पार्टी काँग्रेसमध्ये त्यांची पुन्हा सीपीआय(एम) चे सरचिटणीस म्हणून निवड झाली. एप्रिल २०२२ मध्ये कन्नूर , केरळ येथे झालेल्या २३ व्या पार्टी काँग्रेसमध्ये सीपीआय (एम) चे सरचिटणीस म्हणून तिसऱ्यांदा त्यांची निवड झाली.येचुरी हे माजी सरचिटणीस हरकिशन सिंग सुरजीत यांचा युती उभारणीचा वारसा जपणारे मानले जात होते.मध्ये संयुक्त आघाडी सरकारसाठी समान किमान कार्यक्रम तयार करण्यासाठी त्यांनी पी. चिदंबरम यांच्यासोबत काम केले आणि २००४ मध्ये संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या स्थापनेदरम्यान युती–बांधणी प्रक्रियेचा सक्रियपणे पाठपुरावा केला. ते खेळत होते. त्यांच्या राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीपासूनच धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी लोकाभिमुख सरकार उभारण्यात महत्त्वाची भूमिका.एलढेच नव्हे तर येचुरी पक्षाच्या आंतरराष्ट्रीय विभागाचेही प्रमुख होते, आणि पक्ष त्यांना बहुतेक समाजवादी देशांच्या पक्ष परिषदांमध्ये बंधुत्व प्रतिनिधी म्हणून त्यांची नियुक्ती केली जात असे. एक विपुल लेखक, त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आणि हिंदुस्तान टाईम्ससाठी पाक्षिक स्तंभ लेफ्ट हँड ड्राइव्ह लिहिला , जो मोठ्या प्रमाणावर प्रसारित केला जातो. त्यांनी पक्षाचे पाक्षिक वृत्तपत्र पीपल्स डेमोक्रसी २० वर्षे संपादित केले. पक्षाच्या पदांवर सतत चढता आलेख असलेले येच्युरी उत्कृष्ट लेखकही होते.त्यांची संसदेतील भाषणं लक्षात घेऊन येचुरी यांना २०१७ मध्ये सर्वोत्कृष्ट संसदपटू पुरस्कार ( राज्यसभा ) मिळाला.एक उत्कृष्ट लेखक, विचारवंत आणि बुध्दीजीवी हरपला.विनम्र अभिवादन!

## पान एक वरून

### कला केंद्राच्या नावाखाली वेश्या

उडवल्याची माहिती पोलिसात गुन्हा दाखल झाल्या नंतर या तरुणांनी पोलिसांना दिली अटक झाल्या नंतर बँकेचा पैसा परत बँकेला करण्या साठी तिघांनापण शेती विकावी लागली होती , या कला केंद्राच्या व्यसना पायी अनेकांचा संसार मोडत आहे काहींचा मोडला आहे अनेक जण कर्जबाजारीपणा मुळे आत्महत्या करत आहे मध्यंतरी उपअधिक्षक कुमावत साहेबांनी यांनी तिन्ही केंद्रावर छापा मारून यांचे लायसन्स रद्द केले होते मात्र मागील काही दिवसापासुन हे केंद्र परत सुरू झाली आहेत पोक्सोसारखे गुन्हे दाखल होऊन ही या केंद्रांना परवानगी कोणी व कशी दिली हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकाना पडत आहे राजकारणी व पोलीस प्रशासन या व्यवसाया कडे डोळेझाक करत आहेत चार लोकांचे हित सांभाळण्या पेक्षा अनेकांचे संसार कशे वाचतील या कडे पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची नागरिकांची मागणी आहे.कला केंद्र अन लॉज मालक हे राजकीय नेते समाजसेवक म्हणून घेत आहेत पन हे सामान्य लग्न न झालेल्या युवकांची प्रचंड लुट करत

### मराठा आरक्षण नेत्याविरोधात

आंदोलनाची माहिती जनतेच्या पुढे आली, त्याचा फायदा जरांगेंना मिळाला, यात दोघांचा हात आहे असं सर्वांचं म्हणणं आहे, असा आरोपही छगन भुजबळ यांनी केला.सामाजिक प्रश्नासाठी सामाजिक कार्यकर्ता लढत असताना राजकीय आरोप करून सामजिक कार्यकर्त्याची बदनामी करणे आपल्या सारख्या जेष्ठ नेत्याला शोभत नाही. शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर २ सप्टेंबर रोजी सरकारने अमानुष लाठीचार्ज केल्याने त्या भागात नागरिकांमध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण होते, त्यामुळे मी स्वतः रात्री अडीच वाजता जाऊन त्या भागातील हॉस्पिटलमध्ये जाऊन जखमींची विचारपूस केली, धीर दिला. जरांगे पाटील यांच्या कुटुंबाला धीर दिला, यात चुकीचे काय आहे का? ओबीसींचे राजकीय आरक्षण संपवणाऱ्या भाजपला टोकाचा विरोध करणारा आपल्यासारखा जेष्ठ नेता आज माझ्यावर तसेच राजेश टोपे साहेबांवर 'ज्यांच्या सांगण्यावरून आरोप करत आहेत त्याच नेत्याच्या' हातात आज गृहमंत्रालय आहे. त्यामुळे त्यांना सांगून माझ्यावरील आपण केलेले आरोप सिद्ध करून माझ्यावर कायदेशीर कारवाई करायला सांगा, हे माझे आपणास जाहीर आव्हान आहे. असो! हा शिव–शाहू–फुले–आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र आहे. त्यामुळे दोन समाजात भांडणे लावण्याचा उचललेला विडा खाली ठेवा आणि महाराष्ट्राच्या जनतेला सुखाने नांदू द्या तसेच भाजप नेत्यांच्या नादाला लागून महाराष्ट्राची वाट लावण्यापेक्षा जनतेच्या खऱ्या समस्यांकडे लक्ष द्या, ही विनंती, असं आवाहन रोहित पवारांनी केलं.

### दिघेंच्या आनंद आश्रमात पैशांची

सामान्य माणसाला न्याय दिला होता. पण त्याच दिघे साहेबांच्या आश्रमात बारप्रमाणे पैसे उडविले जाणे, हा दिघे साहेबांचाच अवमान आहे, अशीही टीका नाईक यांनी केली.

संजय राऊत काय म्हणाले?: या राज्याच्या संस्कृतीला कलंकित करण्याचे काम हे सरकार करत आहे. पण ज्यांना गुरू मानले, त्यांनाही यांनी सोडलेले नाही. गुरूचीही अपकीर्ति यामाध्यमातून केली आहे. आनंद दिघेंना यांनी गुरू मानले असले तरी दिघेंनी यांना आपले शिष्य मानले होते का? बारमध्ये पैसे उधळावेत, अशा प्रकारचे कृत्य आनंद दिघेंच्या आसनासमोर झाले. अशाच प्रकारचा पैशांचा धिंगाणा राज्यभरात सुरू आहे. हा धिंगाणा फक्त लुटीच्या पैशांतूनच केला जाऊ शकतो, कष्टाचा पैसा असा उडवला जात नाही. पैसे उडविणाऱ्यांची चौकशी केली पाहीजे. त्यांच्याकडे एवढा पैसा आला कुठून? याचा शोध घेतला पाहिजे, असं राऊत म्हणाले.

### खाद्यतेलावरील आयात शुल्कही

उत्पादने आयात करण्यास शुल्क लावावे आणि सोयाबीन निर्यातीसाठी प्रत्येक क्विंटल मागे किमान ५० डॉलर इतके अनुदान द्यावे, अशा मागण्या केल्या होत्या. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून केंद्र शासनाने मागील आठवड्यातच सोयाबीनची ९० दिवस हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर काल खाद्यतेलावरील आयात शुल्क २० टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आपण केलेल्या ३ पैकी २ मागण्या मान्य केल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी एक्स या सोशल प्लॅटफॉर्मद्वारे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान, केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल तसेच या निर्णयासाठी सातत्याने आग्रह धरणारे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

यापूर्वी किती होते आयात शुल्क? : कच्च्या खाद्यतेलावर पूर्वी ५.५% आयात शुल्क होते ते आता २७.५% असेल तर रिफाइंड तेलावरील आयात शुल्क पूर्वीच्या १३.७५ टक्क्यावरून आता ३५.७५ टक्के इतके वाढवण्यात आले आहे.

### पराभवास कारणीभूत असलेल्या

ला विडा सर्कल मधील मतदारांच्या समजूती काढून ऐनवेळी पक्ष प्रवेश केलेल्या नमिता मुंदडाला आमदार करुण दाखवले होते. बीड लोकसभा निवडणूकीत पंकजाताई मुंडेच्या परावभास कारणीभूत असलेल्या आ. नमिता मुंदडा यांनी येणारी विधानसभेची निवडणुक समोर ठेवून विडा सर्कल मधील भाजपाच मतदान आपल्याला मिळावे म्हणून विडा येथील मोठी लोकसंख्या असलेल्या गावात व वाडी वस्त्यावर उध्दघाट्न करण्याचा सपाटा लावला आहे. या उध्दघाटन कार्यक्रमाला विडा जि.प सर्कल मधील आजी–माजी भाजपा जेष्ठ कार्यकर्त्यांना डावलून व बाहेरच्या सर्कल मधील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन आ. नमीता मुंदडांनी उध्दघाटने शुक्रवारी केली आहेत. विडा सर्कल मधील उध्दघाटन कार्यक्रमा पासुन वंचित ठेवलेले भाजपा जेष्ठ कार्यकर्ते येणा–या विधानसभेच्या निवडणूकीत आ. नमिता मुंदडा यांना मतदान रुपी बदला घेण्याच्या तयारीला लागणार आहेत.

### नियम डावलून साडेतीन

देताच काम केले जात असून, ते काम ही निकृष्ट करण्यात येत आहे.कंत्राटदार आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अभियंता, या दोघांच्या संगनमताने साडेतीन कोटी रू खर्च करून सुरू करण्यात आलेल्या कामाचा अतिशय निकृष्ट दर्जा दिसून येत आहे. या कामा संदर्भात, थातूरमातूर काम करायचे, मलिदा लाटायचा आणि चाटायचा, एवढाच उद्देश ठेवून, गेवराई च्या बसस्थानकावर सिमेंट काँक्रिट व अन्य विकास कामे केली जाणार आहेत का ? असा सवाल उपस्थित केला जात आहे.वाळू ऐवजी डस्ट वापरून इंजिनियर क्या उपस्थित काम केले जात असताना, संबंधित अभियंत्यांने सिल्ट टेस्ट न करता, डस्ट वापरायची परवानगी दिल्याने, या कामात त्यांचीच भागीदारी असल्याची चर्चा आहे.मिक्स डिझाईन, स्काडा रिपोर्ट, या सह अन्य महत्त्वपूर्ण बाबी बासनात गुंडाळून, कंत्राटदार आणि महामंडळाचा इंजिनियर सदरील काम उरकून घेत असून, या कामाची वरिष्ठांनी दखल घ्यावी आणि नियमानुसार काम करून घ्यावे, नसता आंदोलन करण्यात येईल असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

### आंदोलनाची धग अजूनही

डॉक्टरांना दिलं. तसंच त्या म्हणाल्या मी सीबीआयला सांगू इच्छिते की या प्रकरणाचा तपास तीन महिन्यांत पूर्ण करावा. शनिवारी दुपारी ममता बॅनर्जींनी आंदोलनकर्त्या डॉक्टरांची भेट घेतली.ममता बॅनर्जी यावेळी डॉक्टरांना उद्देशून म्हणाल्या, मला माझ्या पदाची चिंता मुळीच नाही. मला तुम्हा सगळ्या आंदोलनकर्त्या डॉक्टरांची काळजी आहे. तुम्हाला ज्या वेदना झाल्या आहेत त्या माझ्याही वेदना आहेत. तुम्हा सगळ्यांच्या सुरक्षेचीही मला चिंता आहे. तसंच तुम्हाला जे वाटतं आहे तेदेखील मी समजू शकते. मी तुम्हाला हा विश्वास देऊ इच्छिते की या प्रकरणात जे कुणीही दोषी आहेत त्यांना आम्ही सोडणार नाही. माझी तुम्हा सगळ्यांना विनंती आहे की तुम्ही आता तुमच्या कामावर परता. असं आवाहन ममता बॅनर्जींनी केलं.काही दिवसांपूर्वीही ममता बॅनर्जी आंदोलनकर्त्या डॉक्टरांना भेटण्यासाठी इच्छुक होत्या. त्यांनी डॉक्टरांची एक बैठकही बोलवली होती. मात्र त्यांनी बोलवलेल्या बैठकीला कुणीही गेलं नाही. त्यानंतर ममता बॅनर्जी असंही म्हणाल्या होत्या की जर तुमचा सरकारवर विश्वास नसेल तर मी मुख्यमंत्रिपदही सोडायला तयार आहे. ममता बॅनर्जी म्हणाल्या होत्या की डॉक्टरांशी चर्चा करण्याची तयारी मी दर्शवली होती. तीन दिवस मी ते भेटीला येतील म्हणून वाट पाहिली. मी त्यांची वाट पाहूनही ते आले नाहीत. जर माझ्यावर विश्वास नसेल तर मी माझं पद सोडायलाही तयार आहे. आजही त्यांनी जेव्हा डॉक्टरांशी संवाद साधला तेव्हा मला माझं पद महत्त्वाचं नाही असं म्हटलं आहे.

## पान सहा वरून

### अंभोरा पोलिसांचा अवैध

कायदे, महिला व बालकांविषयीचे माहिती देऊन पोलिसांचे मोबाईल क्रमांक देऊन संपर्क करण्याचे आवाहन केले. शालेय मुले, मुलींच्या समस्या जाणून घेण्यासाठी शाळा, महाविद्यालयात तक्रारपेटी बसविण्याबाबत शालेय प्रशासनाला सुचित केले. तसेच गणेशोत्सव, रमजान ईद सह इतर सामाजिक उत्सवात सर्व जाती धर्माच्या नागरीकांना एकत्रित आणून सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी पोलिसांनी महत्वाची भूमिका बजावली. त्यामुळे नागरीकांसह शिक्षक, पालकांकडून देखील अंभोरा पोलीस ठाण्याच्या अधिकारी, कर्मचा–यांचे स्वागत होत आहे .

### साळेगाव आरोग्य केंद्र योग्य

येत असल्याने आमचा विरोध आहे. तसेच त्याठिकाणीबाजार भरत असल्याने बाजारात दिवशी अनेक व्यापारी त्या ठिकाणी आपले जनावरे त्या ठिकाणी दावणीला बांधतात त्याचा दाव्यांना हटवल्या तर त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ शकते त्यामुळे व दवाखाना मार्क आउट केलेल्या जागेवर बांधकाम करण्याचा प्रयत्न केल्यानंतर आम्ही गावकरी त्या क्षनी अदोलन करणार आहेत. यांची नोंद न घेतल्यास तसेच जागा उपलब्ध करून न दिल्यास त्याला सरपंच जवाबदार असेल असा उल्लेख दिलेल्या निवेदनात करण्यात आला आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हाध्यक्ष बाबुराव मस्के, युवक जिल्हा सचिव लक्ष्मण ओव्हाळ, बीड पूर्वेचे युवक जिल्हाध्यक्ष बाबुरावजी म्हस्के, लक्ष्मण ओव्हाळ चेयरमन बालचंद्र गिते श्री. अनंत गिते, पांडुरंग गिते, अविनाश गिते, बालू ननवरे, खुर्शीद शेख, जावेद शेख, पप्पू शेख, सचिन गितेराजू, सय्यद सुशेन, गिते महेश, आश्रुबा गिते उपस्थित होते.

### राजकीय नेत्यांच्या भेटीची

कोणत्याही राजकीय भेटी झाल्या नसून सध्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसंग्राम बळकट करण्याच्या दृष्टीने कामकाज सुरू असल्याचे शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी म्हटले आहे.

### बीडमध्ये ताकदीने शक्ती

तुपारे, गणेश लांडगे, ओम सोनकांबळे, वामन पाईक,मिलिंद पोटभरे, अशोक किर्ते, बाबा देशमाने,अण्णा माने, विजय ठोंबरे, संदीप साळवे, बाबा ससाणे, विलास खळगे, राहुल वाघमारे, प्रकाश साळवे, भारत डावरे, रमेश पाईक, बबन चोपडे, सनी प्रधान, कपिल जावळे, अनिल भराटे, अभिजीत वाटवे, सुदर्शन भद्रे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

### म्हणून उपोषण करण्याची

पीऐम किसान, पीकविमा अनुदान, तसेच इतर सुविधेची रक्कम मिळत नाही तसेच याबाबत विचारणा केली असता बँक कर्मचाऱ्यांन कडुन शेतकऱ्यांना धमकावले जाते आहे अरेरावीची भाषा वापरून शेतकऱ्यांना गप केले जात आहे असा होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा मनमानी कारभार सुरू असल्याने सर्वसामान्य माणूस त्रस्त झाले आहेत कारण महाराष्ट्र ग्रामीण बँके खाते दाराचे खाते होल्ड केल्यामुळे खाते दाराच्या खात्यात जमा झालेली रक्कम पीकविमा किसानचे रक्कम , रिटायर कर्मचारी पगार, पीऐम किसान पागार रक्कम मिळत नसल्याने गणेश लाड २५/०९/२०२४ पासुन अमरण उपोषणाला बसणार आहेत असे गणेश लाड यांनी म्हटले आहे

### परळीमध्ये गणपती सजावट

मंडळासाठी गणपती सजावट स्पर्धेत सहभागी होऊन गणेशत्सवाचा आंनद द्विगुणित करुया असे पिनाकी फाउंडेशनचे संस्थापक तथा युवा उद्योजक सुनिल गुट्टे यांनी प्रसिद्ध स दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

### शिवसेनेच्या वतीने जोडे

शिवसेना नेहमीच आरक्षणाचा सन्मान करत आली आहे, संविधानाचा सन्मान करत आली आहे. भारताची राज्यघटना बदलण्याचे काँग्रेसचे षडयंत्र आहे. त्यामुळेच काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत याबद्दल आपले खरे रूप दाखवत आहेत. अमेरीकेत जाऊन आरक्षण रद्द करू असे अपमानजनक विधान राहून गांधी यांनी केले. ही भारताला शर्मनाक करणारी बाब आहे. ही बाब भारताचे नागरिक व शिवसेना कदापि सहन करणार नाहीत. त्यामुळे गांधींनी भारताची माफी मागावी, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांनी केली आहे. याप्रसंगी शिवसेना महिला आघाडी, युवासेना, पदाधिकारी–लोकप्रतिनिधी तथा शिवसैनिकांची उपस्थिती होती.

### पत्रकार संघाकडून हल्ल्याचा

यात पत्रकार दयानंद सोनवणे हे गंभीर जखमी झाले आहेत. याची तक्रार अंमळनेर पोलिसांत दिली आहे. या अवैध धंदे चालकास पोलीसांचे अभय असुन त्याला वाचवण्यासाठी पोलिसांनी त्याला बोलावून घेऊन उलट पत्रकारावरच पैसे मागतो असा आरोप करुन गुन्हा नोंद केला आहे.हा प्रकार पत्रकारीतेला धोकादायक आहे अवैध धंद्याची बातमी छापल्यामुळे पत्रकाराला मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली जाते मात्र पोलिसांनी अद्यापही काही कार्यवाही केली नाही.भ्याड हल्ला करणाऱ्या आरोपींना कठोर शासन करावे व दयानंद सोनवणे यांच्या वर नोद झालेला खोटा गुन्हा तात्काळ मागे घ्यावा नसता तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे पाटोदा तहसील कार्यालय येथे देण्यात आला यावेळी भाई विष्णुपंत घोलप,ज्येष्ठ पत्रकार कादरभाई चाऊस, आमेर शेख, संजय सानप,अजय जोशी, गणेश शेवाळे,हामिद पठाण,सय्यद साजेद, हारिदास शेलार,जावेद शेख,अशोक भवर, फयाज शेख,प्रदीप उबाळे,खंडागळे सर, सचिन गायकवाड यांच्या सह पाटोदा तालुक्यातील पत्रकार बांधव उपस्थित होते

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# तलवाडा केंद्रात चोवीस तास रुग्णसेवा

## डॉ.पूजा शेळके — रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा

आल्ताफ कुरेशी/तलवाडा

ग्रामीण भागात रुग्णांना चांगली सेवा देणे हे प्राथमिक आरोग्य केंद्राची जबाबदारी असून ही जबाबदारी आणि कर्तव्य तलवाडा प्रतिनिधी आरोग्य केंद्रातील वैधकिय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तत्परतेने पार पाडत असून ऑन ड्युटी चोवीस तास रुग्णसेवा करत आहेत. तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्र याठिकाणी डॉ.पूजा शेळके आणि डॉ अक्षय खरवडे यांनी पदभार घेतल्या पासून रुग्णालयात ओपिडी सुरळीतपणे सुरू आहे रोज जवळपास दोनशे जवळपास रुग्णाची तपासणी आरोग्य केंद्रात केली जात असून प्राथमिक उपचार देवून त्यांना औषध उपचार केले जातात.रुग्णांना त्रास होऊ नये याची काळजी घेतली जात असून सर्व आरोग्य बाबतच्या सुविधा पुरवण्यावर डॉक्टरांचा भर आहे त्यामुळे तलवाडा आणि तलवाडा परिसरातील जनतेला तलवाडा याठिकाणी चांगली ट्रीटमेंट मिळत असल्याने रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक समाधानी आहेत. डॉक्टर ही त्यांची जबाबदारी आणि कर्तव्य व्यवस्थित पार पाडत असून रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा असे समजून काम करतात. गेवराई तालुक्यातील



तलवाडा हे गाव राजकीय आणि सामजिक दृष्ट्या महत्वाचे मानले जाते या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राची सुसज्ज सर्व सोयियुक्त भव्य इमारत उभारण्यात आलेली असून या ठिकाणी अवघ्या काही दिवसात ज्यांनी पदभार घेवून सेवेला सुरुवात केली त्या डॉ.पूजा शेळके आणि डॉ.खरवडे यांनी रुग्ण सेवा सुरळीत करण्यावर भर दिला आहे.सर्व कर्मचारी यांना वेळेवर आरोग्य केंद्रात उपस्थित राहणे, सर्व औषधी आरोग्य केंद्रात उपलब्ध ठेवणे,रुग्णालयाची व्यवस्थित स्वच्छता ठेवणे या सूचना देवून सर्वांनी आपल्या कामाप्रती प्रामाणिक राहून ड्युटी करावी असे सांगितले असल्याने त्यांच्या आदेशाचे पालन करत सर्वच कर्मचारी हे

### रुग्णालयात सर्व औषधी उपलब्ध

रुग्णालयात सामान्य रुग्णांना प्राथमिक उपचार दिल्या नंतर दिले जाणारे गोळ्या औषध चां साठा मोठ्या प्रमाणात उपलब्ध ठेवण्यात येत आहे,कोणत्याही रुग्ण अथवा नातेवाईकांना बाहेरून औषध आणायची वेळ येवू नये यासाठी प्रयत्न असल्याचे कर्मचारी राऊत यांनी सांगितले.

### रुग्णवाहिकेची चोवीस तास सेवा सुरू

रुग्णालयात डिलिव्हरी पेशंट आल्यावर किंव्हा आणायचे किंव्हा डिलिव्हरी झाल्यावर घरी नेऊन सोडायचे असेल तर त्या महिला पेशंट साठी मोफत रुग्णवाहिकेची सेवा दिली जाते तसेच तलवाडा येथे उपचार होत नसेल तर उपजिल्हा रुग्णालयात गेवराई किंव्हा जिल्हा रुग्णालयात महिला पेशंट पाठवण्यासाठी या रुग्णवाहिकेची सेवा त्यांना मोफत दिली जाते.

प्राथमिक आरोग्य केंद्रात ऑन ड्युटी चोवीस तास रुग्णांना सेवा पुरवत असल्याने तलवाडा आणि परिसरातील नागरिक समाधान व्यक्त करत आहेत. डॉक्टर रोज आरोग्य केंद्रात उपस्थित राहून रुग्णाची तपासणी करून त्यांना प्राथमिक उपचार देत असल्याने रोज जवळपास दोनशे च्या जवळपास रुग्ण दवाखायत येऊन उपचार घेत आहे.पूजा शेळके यांनी तलवाडा याठिकाणी पदभार घेतल्या पासून याठिकाणी वेळेवर सर्वांना उपचार मिळावे यावर त्यांनी लक्ष दिले असून रुग्णांना आपुलकीने विचारपूस करून त्यांच्या रोगाचे निदान करत असल्याने रुग्ण आणि नातेवाईक त्यांच्या कामाबाबत समाधानी आहेत.दवाखान्यात येणाऱ्या प्रत्येकाला आरोग्य सेवा मिळावी हा उद्देश त्यांनी डोळ्यासमोर ठेवून ग्रामीण भागात काम करण्याचे ठरवले होते त्या अनुषंगाने तलवाडा सारख्या ग्रामीण भागात त्यांनी पदभार घेतला असून प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉकटर,कर्मचारी,आरोग्य सेवक,सफाई कामगार,आशा वर्कर या प्रामाणिक पने काम करत असल्याने जनतेत रुग्णालय विषयी समाधान व्यक्त होत आहे.

# जरंडी पॅटर्न जिल्हाभर राबविणार



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्ह्यात जरंडी ग्रामपंचायत विकसित झालेली आहे गावचा चेहरा मोहरा बदलवून जरंडी ग्रामपंचायतीने जिल्ह्यात वेगळा ठसा उमटवला आहे त्यामुळे जिल्ह्यातील ८३६ ग्रामपंचायत मध्ये जरंडी पॅटर्न राबवून जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलावयाचा आहे अशी माहिती गुरुवारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ओम प्रकाश रामावत यांनी भेटी दरम्यान दिली

स्मार्टग्राम व्हिलेज अंतर्गत जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश रामावत यांनी गुरुवारी अकरा वाजता जरंडी गावाला भेट देऊन तीन तास विविध कामांची विशेष पाहणी केली यामध्ये संगीत कारंजे, हुतात्मा स्मारक घनदाट वृक्ष लागवड, गावातील सी सी टी व्ही फुटेज यंत्रणा, व्यायाम शाळा, स्मारकात पक्षांची शाळा,अभ्यासिका, आदी बाबींची पाहणी केली यावेळी सरपंच स्वातीताई पाटील,उपसरपंच संजय पाटील,ग्रामविकास अधिकारी सुनील मंगरुळे,ग्रामपंचायत सदस्य मधुकर पाटील,दिलीप पाटील,विजय चौधरी,आदींसह ग्रामस्थांनी उपस्थिती होती.

# राष्ट्रीय हिंदी दिन उत्सहात साजरा

## कार्यक्रम: कौशल्या महाविद्यालयाचा उपक्रम

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

विश्वात्मा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर संचलित कौशल्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय पाटेगाव शाळेत आज दिनांक १४ सप्टेंबर वार शनिवार रोजी शाळेमध्ये राष्ट्रीय हिंदी दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान शाळेचे मुख्यध्यापक श्री निलेशजी गायकवाड सर यांनी भूषविले तर प्रमुख पाहुण्यांचे स्थान शाळेचे सहशिक्षक बी.बी.गायकवाड यांनी भूषविले.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती मातेचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यानंतर इयत्ता ८ वी च्या विद्यार्थिनींनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत गीत गाऊन स्वागत केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष,प्रमुख पाहुणे,विद्यार्थी मुख्याध्यापक व शाळेतील सर्व शिक्षक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्तविक शाळेचे सहशिक्षक श्री आकेश दांडेकर यांनी केले. त्यानंतर इयत्ता ५ वी ते १० च्या विद्यार्थ्यांनी



हिंदी दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचे महत्व याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील विद्यार्थीनी कु.अर्चना लोखंडे व आरती धरम यांनी केले तर आभार शाळेतील सहशिक्षक श्री प्रविण काळे यांनी व्यक्त केले.यावेळी शाळेतील सहशिक्षक नंदकिशोर पातकळ,बालाजी नलभे,विजय सपकाळ, सोन्याबापू पालवे, नारायण औटे, अमोल गायकवाड, प्रकाश कामडी, अनिता तारख, शितल थिटे, अस्मिता भिसे, स्वप्नील गव्हाणे, अक्षय शेळके ,निखील पापुलवार, सतिष पवार, विठ्ठल त्रिभुवन, महेश गायकवाड आदी उपस्थित होते.

# दीड टन गोमांस पकडले

## कारवाई: साडेअकरा लाखाचा मुद्देमाल जप्त

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील खडकत परिसरातील जामखेड रस्त्यावरील सीना नदीच्या पुलावर शनिवारी पहाटेच्या सुमारास एक पिकप पोलिसांनी पाठलाग करून पकडला, त्यामध्ये असलेले गोवंशीय दीड टन गोमांस व पिकप वाहनासह पोलिसांनी ११लाख ७५ हजाराचा मुद्देमाल जप्त करुन केला. पिकप मालकासह इनायत अली शौकत सय्यद (वय-५४) रा. अ.नगर याच्याविरुध्द आष्टी पोलिस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, शनिवार दि.१४ रोजी पहाटे अडीच वाजेच्या सुमारास आष्टी तालुक्यातील खडकत परिसरात पोलीस रात्रीच्या गस्तीवर



असताना (एमएच ०४/एलई/०४९७) असा क्रमांक असलेला बंद बॉडीचा पांढरा रंगाचा एक संशयित पिकप रस्त्याने सुसाट धावताना आढळून आला. इशारा करुनही न थांबल्याने अखेर पोलिसांनी त्या पिकपचा पाठलाग करुन जामखेड रस्त्यावरील सीना नदीच्या पुलावर पकडला. यासंदर्भात अधिक चौकशी केली असता, त्या पिकपमध्ये ३ लाख ७५ हजाराचे गोवंशीय जातीच्या जनावरांचे तब्बल दीड टन वजन असलेले गोमांस आढळून आले.

पिकपसह ११लाख ७५ हजाराचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त करुन पोह अशोक शिंदे यांच्या फिर्यादीवरुन त्या पिकप मालकासह इनायत अली शौकत सय्यद रा. अ.नगर याच्याविरुध्द आष्टी पोलिसांत महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

पोनि जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि विक्रांत हिंगे, पोउपनि कृष्णा शिंदे, अशोक तांबे, सय्यद मजहर यांनी कारवाई केली. पुढील तपास पोना प्रविण क्षीरसागर करीत आहेत.

# आईचा सन्मान होणे अपेक्षित

## महागुरू स्वामी:मतमाऊली यात्रा महोत्सव




राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

आपण आपल्या आईचा सन्मान केला नाही तर मतमाऊलीचा ही सन्मान होत नाही म्हणून आगोदर आपल्या आईचा सन्मान करावा असे नाशिक धर्म चे महागुरू स्वामी बाथेल बरेटो यांनी हरेगाव यात्रा महोत्सवातील प्रवचनात केले आजचा काळात महिलांवर अन्य अत्याचार होण्याचे प्रमाण वाढले आहे मुलींना शिक्षणासोबतच संरक्षणाची आवश्यकता असल्याचे त्यांनी आपल्या प्रवचनात सांगितले

या वेळी पवित्र वेदीवर हरेगाव धर्मगामाचे प्रमुख धर्मगुरु डॉमानिक रोझारिओ धर्मगुरु ज्यो गायकवाड फा आनंद बोधक फा सतिश कदम फा रिचड फा प्रमोद मकासरे राजेंद्र लोंढे जेम्स थोरात फा मुक्ती फा प्रशांत शहाराव फा प्रकाश राऊत आदी सह धर्मग्रामातील प्रमुख धर्मगुरु उपस्थित होते.हरेगाव यात्रा महोत्सवाला राज्य व परराज्यातील ६ लाख भाविकांनी भक्ती भावाने मतमाऊली चे दर्शन घेतले या वर्ष पदयात्रेने येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय होती पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

# शिक्षणाधिकाऱ्यांना काळे फासणार

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी



मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत माजलगाव तालुक्यामध्ये प्रशिक्षकांच्या निवडीमध्ये मोठ्या प्रमाणात बोगसगिरी झाली आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे निवड न करता यामध्ये आर्थिक तडजोड, वशिलेबाजी व मर्जीतील लोकांना संपर्क करून त्यांचेच अर्ज घेतले व तात्काळ नियुक्ती पत्रे हि दिले. नियमानुसार व पारदर्शकपणे प्रक्रिया न घेतल्यामुळे अनेक होतकरू तरुणांना आपल्या हक्काच्या नोकरीसाठी मुकावे लागणार आहे .तरी याचा निषेध म्हणून राष्ट्रवादी युवक काँग्रेस माजलगाव तालुक्याच्या वतीने शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी काळे फासण्यात येणार आहे.असे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मनोज फरके यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

# लाडकी बहीण योजनेची जनजागृती

## योजना: मांडवा येथे पथ नाट्यातून जनजागृती




परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील मांडवा येथे सकाळी एक पथ नाट्याने जन जागृती अभियान अंतर्गत सादरीकरण केले व मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची जागृती करत महिलांना या योजनेचे महत्त्व पटवून दिलेसध्या महायुती सरकारने केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे जनजागृती अभियान बीड जिल्ह्यामध्ये जोरात सुरू आहे.

अंबाजोगाई तालुका व परळी तालुक्यातील अनेक गावांमध्ये हे पथक गावोगावी जाऊन मुख्यमंत्री लाडके बहीण योजनेची बीड जिल्हा प्रशासना कडूने मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. यात विविध महाराजाकडून गावो गावी कीर्तनाच्या माध्यमातून विविध ठिकाणी व ग्रामीण भागात गावो गावी बॅनर लावण्यात आले आहे. व एलईडी व्हॅन मधून व्हिडिओ द्वारे या योजनेची जनजागृती करण्यात येत आहे. पथनाट्याद्वारे जनजागृती नागरिकांना आकर्षित करत आहे यामुळे गावातील चावडीवर पथनाट्याच्या बाजूला नागरिक एकत्र होऊन या योजनेचे महत्त्व जाणून घेतले आहेत यामध्ये महिलांबाबत कमालीची उत्सुकता आहे.

# रस्ता न करताच लाटला मंजूर निधी!

## गणेश देवकते — वडखेल ग्रामपंचायत समोर उपोषण

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी तालुक्यातील वडखेल ते वडखेल तांडा अप्रोच रस्त्यासाठी मंजुर असलेले पाच लाख रुपये काम न करताच अधिकारी व गुत्तेदारांनी संगणमत करून उचलले आहेत. पैसे उचलणारा वर कारवाई करावी व रस्त्याचे काम करावे या मागणीसाठी वडखेल येथील ग्रामस्थ १३ सप्टेंबर पासुन वडखेल ग्रामपंचायत कार्यालया समोर उपोषणास बसणार असल्याचे निवेदन गणेश देवकते यांनी दिले आहे.

बीड च्या जिल्हाधिकारी यांना मंगळवारी (ता.३) निवेदन देण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे की जिल्हा नियोजन समितीच्या अंतर्गत वडखेल



ते वडखेल तांडा रस्त्याच्या मजबूती करणासाठी पाच लक्ष रुपयांचा निधी सन २०२३ ते २०२४ च्या कार्यकाळात जिल्हा नियोजन समितीच्या नियोजनातून मंजूर करण्यात आला होता. सदरील रस्त्याचे काम कसल्याही प्रकारचे न करता शासनाचा निधी उचलून घेतला आहे. रस्त्याचे काम न करता अधिकारी यांच्या सगंमताने गुत्तेदार यानी बनावट एमबी तयार करून पूर्ण बिल उचलून घेतले आहे. सबंधीत रस्ता न करता वडखेल ग्रामस्थांची फसवणूक केली आहे. शासनाच्या पाच लक्ष रुपये निधी उचलून शासनाची फसवणूक केली आहे. या प्रकरणातील दोषी असणाऱ्या अधिकारी व सबंधित एजन्सी गुत्तेदार यांच्यावर भ्रष्टचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा. शासनाने मंजूर केलेल्या रस्त्याचे काम तात्काळ करावे या मागणीसाठी वडखेल ता. परळी वैजनाथ येथील सर्व लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ १३ सप्टेंबर २०२४ रोजी वडखेल ग्रामपंचायत कार्यालय समोर आमरण उपोषणास बसणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे भटक्या विमुक्त सेलचे तालुकाध्यक्ष गणेश देवकते यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, संबंधित शासकिय यंत्रणेला देण्यात आले आहे.

# केज उपजिल्हा रुग्णालयात पोषण माह

## धोरण:महिलांना करण्यात आले मार्गदर्शन



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज उपजिल्हा रुग्णालयात पोषण माह साजरा, महिलांना केले मार्गदर्शन करण्यात आले.केज येथील उपजिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय पोषण माह साजरा करण्यात आला. यावेळी सुपोषित भारत, साक्षर भारत, सशक्त भारत, अनेमिया, पूरक आहार, पौष्टिक आहार सर्वांसाठी, पोषण पण शिक्षण पण, एक झाड आईच्या नावाने अशा वेगवेगळ्या आहाराचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. तर वैद्यकीय अधिक्षक डॉ. दत्तात्रय केंद्रे यांनी पोषण आहार विषयी मार्गदर्शन केले. यावेळी आहार तज्ञ सुलक्षणा पाटील यांनी आहाराची पौष्टिकता वाढवणे, ऋतुप्रमाणे कसा आहार घ्यावा, कमी खर्चात पौष्टिक आहार कसा घ्यावा, भरड धान्यांचे महत्त्व, गरोदर मातेचा आहार, स्तनदा मातेचा आहार, स्तनपानाचे महत्व, बाळाचा पूरक आहार याविषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला समुदेशक सीता गिरी, डॉक्टर, नर्स, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

**सुविचार-** देशातील दारिद्र्य व अज्ञान घालविणे म्हणजेच ईश्वराची सेवा होय.

# आहे ते तर सांभाळा....!

सध्या जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुकीचा प्रचार सुरू आहे. निवडणूक प्रचारातील भाषणे म्हटले की त्यात जोश, उत्साह आणि काही प्रमाणात अतिशयोक्ती असतेच. अशी वास्तवाशी फारकत घेणारी जोशपूर्ण भाषणे दुसऱ्या तिसऱ्या फळीतील नेत्यांना शोभून दिसतात किंवा त्यांनी काहीही बोलले तरी खपून जाते; परंतु सरकारमधील एखादा जबाबदार आणि ज्येष्ठ मंत्री जेव्हा अशा स्वरूपाची भाषा वापरतो, तेव्हा मात्र त्यावर विचार होणे, प्रश्न निर्माण होणे आणि त्या संदर्भात स्पष्टीकरण या सगळ्या गोष्टी आवश्यक ठरतात. पाकव्याप्त काश्मिरातील नागरिकांनी भारतात सामील व्हावे, असे आवाहन या प्रचारादरम्यान संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केले. पाकव्याप्त काश्मीर भारतात अधिकृतरित्या सामील करून घेण्याचा प्रश्न इतक्या सहजपणे सुटू शकला असता तर तो इतके दिवस रेंगाळलाच नसता. इतके जटील प्रश्न अशा आवाहनाने वगैरे सुटणार नाही याची तर त्यांनाही कल्पना असेल; परंतु समोर बसलेल्या मतदारांना रिझवण्यासाठी म्हणा किंवा त्यांच्यात अपेक्षित जोश निर्माण करण्यासाठी त्यांनी हे वक्तव्य केले असावे. त्याआधी सार्वत्रिक निवडणुकांच्या तोंडावर गृहमंत्री अमित शाह यांनीदेखील पाकव्याप्त काश्मीरला भारताचा भाग बनवण्याबाबत भाष्य केले होते. या दोन्ही नेत्यांची भाषणे निवडणूक प्रचारातली असली तरी हे दोन्ही नेते सध्या ज्या पदावर आहेत त्या पदाचे महत्त्व आणि प्रतिष्ठा लक्षात घेता त्यांनी अशी उथळ वक्तव्य टाळणे गरजेचे ठरते. कदाचित भारताच्या आक्रमक धोरणामुळे म्हणा किंवा पाकव्याप्त काश्मिरातील जनतेवर पाकिस्तान सरकारकडून जो अन्याय केला जात आहे त्यामुळे म्हणा, उद्या हा भाग भारतात सामील होईलही; परंतु पुढे काय हा प्रश्न त्यासोबतच निर्माण होईल. भारताच्या सीमावर्ती राज्यांमधील सध्याची परिस्थिती किंवा अस्वस्थता लक्षात घेता पाकव्याप्त काश्मीर भारतात अधिकृतपणे सामील झाला तरी एक नवे दुखणे किंवा एक नवी जखम यापेक्षा फार काही भारताच्या हाती लागणार नाही. पाकिस्तानची फाळणी करीत बांगलादेशाची निर्मिती भारतानेच केली होती. आज काय अवस्था आहे, पूर्वी एकसंध पाकिस्तान भारताचा शत्रू होता, आता पूर्वेकडील शत्रूचे नाव तेवढे बदलले. बांगलादेशात महिनाभरापूर्वी जे काही घडले आणि सध्याही जे सुरू आहे ते पाहता बांगलादेशाची निर्मिती करून भारताने आपली डोकेदुखी तेवढी वाढवून घेतली, असेच म्हणावे लागेल. या पृष्ठभूमीवर पाकव्याप्त काश्मीर अधिकृतपणे भारताला जोडण्याचा आग्रह राष्ट्रवादी भावनेने भारलेला भलेही असेल; परंतु आहे ते सांभाळणे जड जात असताना हे नवे दुखणे पदरात बांधून घेणे भारताला कितपत परवडणार आहे? चीन वगळता आपल्या सगळ्या शेजारी राष्ट्रांच्या तुलनेत भारताचे लष्करी सामर्थ्य खूप अधिक आहे, भारताकडे तितकेच मोठे निमलष्करी दल आहे, पोलीस व्यवस्था आहे, निर्णय घेणारी, न्याय करणारी एक सुदृढ व्यवस्था आहे आणि इतके सगळे असूनही एका छोट्या प्रांतात सुरू असलेला हिंसाचार वर्षापेक्षा अधिक काळ उलटून गेला तरी थांबविता येत नसेल तर कुठेतरी काही तरी चुकत आहे, असेच म्हणावे लागेल. हे जे काही चुकत आहे ते आजचे नाही, या चुकण्यामुळेच भारताच्या सीमावर्ती राज्यांमध्ये भूतकाळात अनेकदा अगदी स्फोटक परिस्थिती निर्माण झाली आहे. पंजाबमध्ये भिंद्रानवालेंचा हैदोस सुरू होता तेव्हा तिथे जणू काही समांतर सरकार कार्यरत होते. सुवर्णमंदिरात ठाण मांडून भिंद्रानवाले संपूर्ण पंजाबवर नियंत्रण ठेवू पाहत होता आणि काही काळ त्यात त्याला यशदेखील आले. लष्करी कारवाईमुळे पुढचा धोका टळला; परंतु परिस्थिती इतकी बिकट होण्यामागे जी काही कारणे होती, ती तेव्हाही आणि आतादेखील तितकीच प्रभावी आहेत, असे सखेदाने म्हणावे लागते. या ज्ञात-अज्ञात कारणांमुळेच छोट्याशा मणिपूरमधील हिंसाचार तिथे लष्कर तैनात करूनही अद्याप पूर्णपणे काबूत आलेला नाही. गेल्या दोन-तीन महिन्यांत त्या राज्यातील परिस्थिती अधिकच चिघळली आहे. या संघर्षात सामील असलेल्या दोन्ही जमातींकडे स्वयंचलित शस्त्रे आहेत. पोलीस स्टेशन किंवा अगदी लष्करी छावण्यांवर हल्ले करून हे लोक शस्त्रे पळवित आहेत आणि त्या शस्त्रांचा एकमेकांविरोधात खुलेआम वापर केला जात आहे. मागच्या आठवड्यात तर थेट माजी मुख्यमंत्र्यांच्या घरावर ड्रोनने हल्ला करण्यात आला होता, त्यामुळे आता तिथे लष्कराला ड्रोन-विरोधी यंत्रणाही तैनात करावी लागली. या संघर्षात राजकीय गुंतागुंत असल्यामुळेच हा संघर्ष थांबविण्यात राज्य आणि केंद्र सरकारला अद्याप यश आलेले नाही किंवा त्या दृष्टीने निर्णायक प्रयत्नच झाले नाहीत. राजकारण जर या स्तराला जात असेल तर आहे ते सांभाळले तरी खूप झाले, नवे प्रांत जोडून काय दिवे लावणार, हा प्रश्न विचारल्या जाणे स्वाभाविक आहे.

# केजरीवाल तसे मोकळे....!

जवळपास सहा महिने तुरुंगात घालविल्यानंतर अखेर दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयातून जामीन मंजूर झाला. मध्ये काही दिवसांसाठी लोकसभा निवडणुकीत प्रचार करता यावा म्हणून त्यांची सुटका करण्यात आली होती. केजरीवाल यांच्यावर सरकारचे प्रमुख म्हणून दिल्लीतील मद्य घोटाळ्यात गैरप्रकार केल्याचा आरोप होता किंवा आहे. याच प्रकरणात पोलिसांनी त्यांना अटक केल्यानंतर जामिनावर बाहेर येण्यासाठी त्यांनी अनेकदा प्रयत्न केले; परंतु प्रत्येकवेळी कोणता तरी नवा मुद्दा उपस्थित करीत सीबीआय आणि ईडीने त्यांच्या जामिनाला विरोध दर्शविला आणि न्यायालयानेही तो मान्य केला. त्यामुळे मुख्यमंत्री पदावर असलेल्या व्यक्तीस तब्बल सहा महिने तुरुंगात राहावे लागले. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील हा आतापर्यंतचे एकमेव उदाहरण ठरले आहे. केजरीवाल यांना जामीन मंजूर झाला असला तरी तो सशर्त आहे. न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर करताना काही अटी त्यांच्यासमोर ठेवल्या आहेत. अरविंद केजरीवालांनी तुरुंगात गेल्यानंतरही मुख्यमंत्रिपद सोडले नव्हते. त्यामुळे आताही ते दिल्लीचे मुख्यमंत्री आहेत; परंतु न्यायालयाने त्यांना जामीन देताना मुख्यमंत्री म्हणून काम करण्याच्या त्यांच्या अधिकारांवर बरेच नियंत्रण आणल्याचे दिसते. त्यामुळे मुख्यमंत्री म्हणून ते कोणत्याही फाईलवर स्वाक्षरी करू शकणार नाहीत, याचा अर्थ मुख्यमंत्री म्हणून ते कोणताही निर्णय घेऊ शकणार नाही, सध्या ज्या प्रकरणात त्यांच्या विरोधात आरोप दाखल करण्यात आले आहेत त्या प्रकरणाशी संबंधित मुद्यांवर ते सार्वजनिक वक्तव्ये करू शकणार नाहीत, त्यांना सचिवालयात जाण्यासाठी बंदी घालण्यात आली आहे, तपास यंत्रणांना योग्य ते सहकार्य करणे त्यांना बंधनकारक करण्यात आले आहे, अशा अनेक अटींवर त्यांची सुटका करण्यात आली आहे. जामिनाच्या अटींद्वारे जी काही बंधने त्यांच्यावर घालण्यात आली आहेत ते पाहता या सुटकेचा निर्भेळ आनंद त्यांना मिळू शकणार नाही. परंतु राजकीयदृष्ट्या ते अधिक शक्तीशाली होऊ शकतात. आपल्याला बळीचा बकरा बनविण्यात आल्याचा प्रचार ते नक्कीच करतील. या सगळ्यामुळे त्यांच्या बद्दल सहानुभूती निर्माण होऊ शकते आणि कदाचित त्याचा फायदा त्यांना हरियाणा विधानसभा निवडणुकीत मिळण्याची शक्यता आहे. म्हणजे एका बाजूने ते अटींमध्ये गुरफटले असले तरी राजकीयदृष्ट्या ते पूर्वीपेक्षा अधिक शक्तीशाली झाले, असे नक्कीच म्हणता येईल.

## दृष्टिक्षेप

# विदर्भातील असमतोल औद्योगिक विकास!

आज माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण आल्याने पुण्यातील माहिती तंत्रज्ञान कंपन्या या दुसऱ्या राज्यात/प्रांतात स्थलांतरित होत असल्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून येत आहेत. ? याचा फायदा विदर्भाने घेतला पाहिजे व महाराष्ट्राबाहेरील जाणाऱ्या माहिती तंत्रज्ञान कंपन्यांना विदर्भात योग्य त्या पायाभूत सुविधा व सवलती देऊन येथे आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

प्रा. डॉ. संजय त्रिं. खडक्कार
7276614260
माजी तज्ञ सदस्य,
विदर्भ वैधानिक विकास मंडळ

महाराष्ट्रात नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, पुणे व कोकण (मुंबई व ठाणे महसूल विभागांना एकत्रित करून) असे एकूण सहा प्रशासकीय विभाग आहेत. नागपूर व अमरावती हे दोन प्रशासकीय विभाग विदर्भात येतात. नागपूर विभागात गोंदिया, भंडारा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे आहेत तर अमरावती विभागात अकोला अमरावती, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा जिल्हा येतात. विदर्भातील, नागपूर विभागाचे (पूर्व विदर्भ) भौगोलिक क्षेत्र ५१,३७७ चौ.किमी.(५२.७५ टक्के) व अमरावती विभागाचे(पश्चिम विदर्भ) भौगोलिक क्षेत्र ४६,०२७ चौ.किमी.(४७.२५ टक्के) आहे. नागपूर विभागाची लोकसंख्या (२०११) ही १,१७,५४,४३४ (५१.०७ टक्के) तर अमरावती विभागाची लोकसंख्या (२०११) ही १,१२,५८,११७ (४८.९३ टक्के) आहे. म्हणजे दोन्ही विभागांचे भौगोलिक क्षेत्र व लोकसंख्या, जवळपास, सारखीच आहे.

महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार (२०२३-२०२४) उर्वरित महाराष्ट्राच्या दृष्टीने नागपूर व अमरावती या दोन्ही विभागात औद्योगिक विकास हा कमी प्रमाणात झालेला दिसतो, तर अमरावती विभागात औद्योगिक विकासाची परिस्थिती चिंताजनक आहे. मोठे उद्योग असो की महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटक की सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रमांची (एमएसएमई) संख्या, सर्वच क्षेत्रात अमरावती विभाग हा महाराष्ट्रातील सर्व विभागांपेक्षा, सर्वात मागे पडलेला दिसतो.

आज मोठ्या उद्योगात, नागपूर विभागात, इंडोरामा सिंथेटिक लिमिटेड, सनफ्लॅग आयरन अँड स्टील कंपनी लिमिटेड, जे.एस. डब्ल्यू.स्टील लिमिटेड, उत्तम गॅल्वा स्टील लिमिटेड, सोलर इंडस्ट्रीज लिमिटेड, हल्दीराम फूड इंटरनॅशनल लिमिटेड, आर सी प्लॅस्टो इंडस्ट्रीज लिमिटेड, लॉईड मेटल अँड इंडस्ट्री लिमिटेड, अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, दालमिया सिमेंट इंडस्ट्रीज, गुजरात अंबुजा सिमेंट लिमिटेड इत्यादी उद्योग समूह आहेत, तर अमरावती विभागात फक्त रेमंड, सियाराम, शुभम टेक्स्टाईल्स अशा टेक्स्टाईल्स इंडस्ट्रीज आहे.

अमरावती विभागात, औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटकांची (३१ डिसेंबर,२०२३) संख्या ३,०११ आहे ज्यात ८,०१५ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे, हीच नागपूर विभागात औद्योगिक घटकांची संख्या ५,०४८ असून गुंतवणूक ही २७,५६७ कोटी रुपयांची आहे. यामध्ये उपलब्ध रोजगार अमरावती विभागात फक्त २५,००० असून, नागपूर विभागात ते १ लाख ५२ हजार आहेत. हीच तुलना आपण पुणे विभागाची केली तर तेथे औद्योगिक घटकांची संख्या १५,६०२ असून १,१३,३४२ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे.

आता बघु या सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रमांकडे. अमरावती विभागात सूक्ष्म उपक्रमांची संख्या १,०९,४६५ असून त्यात रोजगार ३.९६ लाख उपलब्ध झाला आहे. तर नागपूर विभाग सूक्ष्म उपक्रमांची संख्या ३,९०,८५१ असून त्यात रोजगार७.९७ लाख उपलब्ध झाला आहे. या तुलनेत आपण फक्त पुणे विभागाचा विचार केला तर येथे सूक्ष्म उपक्रमांची संख्या ७,९८,९४२ असून तेथे २५.९६ लाख रोजगार उपलब्ध झाला आहे.

अमरावती विभागात लघु उपक्रमांची संख्या २,२०४ असून त्यामुळे रोजगार २५ हजार निर्माण झाला आहे. तर नागपूर विभागात लघू उपक्रमांची संख्या ७,६०२ असून, त्यामुळे रोजगार ९३ हजार उपलब्ध झाला आहे. या दोन विभागाची तुलना पुणे विभागाशी केली असता येथे लघू उपक्रमांची संख्या १७,५५७ असून त्यामुळे रोजगार ३.८९लाख निर्माण झाला आहे.

अमरावती विभागात मध्यम उपक्रमांची संख्या १९३ असून त्यामुळे रोजगार ७ हजार निर्माण झाला आहे. तर नागपूर विभागात मध्यम उपक्रमांची संख्या ८५७ असून त्यामुळे रोजगार ४५ हजार निर्माण झाला आहे. हीच तुलना आपण पुणे विभागाशी केली असता येथे मध्यम उपक्रमांची संख्या ४,७७०, त्यामुळे तेथे ३.५४ लाख रोजगार निर्मिती झाली आहे.

देशाच्या सॉफ्टवेअर निर्यातीत महाराष्ट्राचा लक्षणीय हिस्सा आहे. महाराष्ट्रात माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने खासगी क्षेत्राला सहभागी करण्यात आले आहे. ऑक्टोबर २०२३ अखेर महाराष्ट्रात एकूण ६२८ खासगी माहिती तंत्रज्ञान संकुले, ज्यात पुण्यात २२०, मुंबई व मुंबई उपनगर शहरात १९६, ठाणे १९६, नागपूर व नाशिकमध्ये प्रत्येकी ०५, छत्रपती संभाजी नगर ०४, वर्धा ०१ व रायगड जिल्ह्यात ०१ आहे. महाराष्ट्रातील ६२८ माहिती तंत्रज्ञान संकुलांपैकी विदर्भात फक्त सहा, ती पण पूर्व विदर्भात. 'यात पश्चिम विदर्भात एकही माहिती तंत्रज्ञान संकुल मंजूर करण्यात आले नाही.' त्यामुळे पश्चिम विदर्भात, माहिती तंत्रज्ञान, कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक इत्यादी विषयांत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना नोकरीसाठी मुंबई- पुणे किंवा दुसऱ्या राज्यात जावे लागते.

आज माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण आल्याने पुण्यातील माहिती तंत्रज्ञान कंपन्या या दुसऱ्या राज्यात/प्रांतात स्थलांतरित होत असल्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून येत आहेत. याचा फायदा विदर्भाने घेतला पाहिजे व महाराष्ट्राबाहेरील जाणाऱ्या माहिती तंत्रज्ञान कंपन्यांना विदर्भात योग्य त्या पायाभूत सुविधा व सवलती देऊन येथे आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

एकंदरीत, औद्योगिक क्षेत्र व सेवा क्षेत्रांचा विकास न झाल्याने महाराष्ट्रात, विदर्भातील अमरावती विभाग आर्थिकदृष्ट्या सर्वात मागासलेला आहे.

महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार (२०२३-२०२४) नागपूर विभागाचे दरडोई उत्पन्न २,२५,७५५ कोटी रुपये, तर अमरावती विभागाचे दरडोई उत्पन्न १,४५,९१७ कोटी रुपये आहे. त्यात फक्त नागपूर जिल्ह्याचे दरडोई जिल्हा उत्पन्न बघितल्यास ते २,९२,६०७ कोटी रुपये आहे, जे अमरावती विभागाच्या जवळपास दुप्पटहून जास्त आहे. या तुलनेत नुसत्या पुणे जिल्ह्याचे दरडोई जिल्हा उत्पन्न हे ३,३६,५०३ कोटी रुपये, मुंबईचे ४,१२,६९० कोटी रुपये तर ठाणे जिल्ह्याचे ३,५३,२९९ कोटी रुपये आहे. त्यामुळे असे म्हणता येईल की महाराष्ट्राचा विकास हा असमतोल तर आहेच, ज्यात विदर्भ तर आर्थिकदृष्ट्या मागे पडला आहे, पण दुर्भाग्याने विदर्भाचा विकास पण असमतोलच झालेला दिसतो, त्यात पश्चिम विदर्भ मोठ्या प्रमाणात पिछाडलेला दिसतो.

आज अमरावती विभागातील अविकसित किंवा मागासलेले औद्योगीकरण व सिंचनाच्या अभावी न परवडणारी शेती, व नगण्य सेवा क्षेत्र, त्यामुळे रोजगाराच्या संधी इथल्या युवकांना उपलब्ध होत नाही. त्यामुळे अमरावती विभागाच्या प्रगतीसाठी, उच्चतम पायाभूत सुविधांची निर्मिती ज्यात हवाई वाहतुकीची सुरुवात, गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी औद्योगिकीकरणात सूट व सवलती, कौशल्यपूर्ण मनुष्यबळ निर्मितीसाठी उच्च शिक्षणाच्या राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्थांची स्थापना करणे गरजेचे आहे. जेणेकरून येथील कौशल्य प्राप्त युवकांना रोजगारासाठी दुसरीकडे न जाता येथेच रोजगार प्राप्त होईल. त्यामुळे पश्चिम विदर्भातील आर्थिक परिस्थिती ही सुधारण्यास मदत होईल व एकंदरीत महाराष्ट्रातील जिल्ह्यांमधील असणारी आर्थिक विषमता दूर होण्यास मदत होईल. हे पण येथे नमूद करावेसे वाटते की जागतिक बँकेच्या एका अभ्यासात असे आढळून आले की प्रादेशिक विषमता १० टक्क्यांनी कमी केल्यास सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) दीड टक्क्यांनी वाढ होऊ शकते.

## प्रासंगिक

# सहकार तत्त्व, जनहित महत्त्व.. हेच निशांतचे मुख्य सूत्र



डॉ. ज्ञानेश्वर मिरगे
9404553505
(राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त)
सल्लागार समिती सदस्य निशांत शाखा, शेगाव

**निशांत पतसंस्थेच्या ३३व्या वार्षिक आमसभेनिमित्त...**

ग्राहकाभिमुख सेवा म्हणजे निशांत असे समीकरणच आज झालेले आहे. भावी काळातील पतसंस्थेच्या योजनेविषयी विचार व्यक्त करताना संस्थापकीय अध्यक्ष, माननीय श्री प्रकाशभाऊ आणि निशांतचे विद्यमान अध्यक्ष श्री. रणधीरभाऊ म्हणतात की, यापुढे रेल्वे, लक्झरी, विमानाचे आरक्षण, टेलिफोन बिल स्वीकृती सुविधा, मोबाईल रिचार्ज, नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड, ट्रान्सफर सुविधा संस्थेच्या वतीने देण्याचा आमचा प्रयत्न राहील. सध्या निशांतची वाटचाल ६०० कोटीकडे सुरू आहे. निशांतच्या प्रगतीसाठी सर्व भागधारक ठेवीदार कर्जदार आणि ग्राहक यांचे अमोल सहकार्य असल्यानेच निशांतची, यशस्वीतेकडे वाटचाल सुरू आहे.


बिना सहकार नही उद्धार... या सहकाराच्या तत्त्वानुसार, सहकार क्षेत्रात अभ्यासू व्यक्तीच्या सहकार्याने, दैनिक देशोन्नतीचे संपादक, आदरणीय श्री. प्रकाश भाऊ पोहरे यांनी, ०८ मे १९९२ रोजी अकोला नगरीत निशांत पतसंस्थेची स्थापना केली. आज ३२ वर्षांचा कालखंड पूर्ण होत आहे. महाराष्ट्राच्या जडण-घडणीसाठी, महत्त्वाचा वाटा ठरत असणाऱ्या सहकार क्षेत्रात, आजही निशांतची विश्वासार्हता टिकून आहे. निशांत सातत्याने प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. ३१ मार्च २०२४ रोजी, संस्थेच्या एकूण ४४ शाखा ग्राहकांना गुणवत्तापूर्ण सेवा देत आहेत. त्यात एक शाखा मध्य प्रदेशमधील इंदोर येथील आहे. निशांतचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय श्री. प्रकाशभाऊ पोहरे आणि निशांतचे विद्यमान अध्यक्ष, अकोला पूर्वचे विधानसभा जनप्रतिनिधी श्री. रणधीरभाऊ सावरकर यांच्या मार्गदर्शनाने वाटचाल सुरू आहे. सुमारे २७० कर्मचारी बंधू यात सहयोग देत आहेत. आज निशांतची एकूण सभासद संख्या १,०६,६३८ असून, मार्च २०२४ अखेर, अहवाल वर्षातील नफा १,३४,७१,४३९ आहे. सुमारे २२५.८९ कोटी रुपये विविध संस्थेत गुंतवणूक केलेली असून, संस्थेच्या एकूण ठेवी ४७४. ५४ कोटी रुपयांच्या आहेत.

संस्थेने एकूण कर्जवाटप ३१०.११ कोटी रुपयांचे केले असून, संस्थेबद्दल व्यापक हिताचा दृष्टीकोन समोर ठेवून, कर्जदाराची परतफेड करण्याची क्षमता लक्षात घेऊन कर्जवाटप करण्याचे संस्थेचे धोरण कार्यवाहीत आणले जाते. ज्याला कर्ज द्यायचे त्याच्याकडे उत्पन्नाचा आर्थिक स्त्रोत काय आहे, हे शाखेची स्थानिक व्यवस्थापन समिती पूर्णपणे जाणून घेते. आणि ग्राहकाचे कर्ज मंजूर केले जाते. संस्थेच्या घटनात्मक निर्णयानुसार समाज जीवनातील सर्व घटकांना कर्ज पुरवठा करण्याचे धोरण निशांतचे आहे. समाजाच्या उन्नत जीवनाच्या प्रगतीला, पोषक असे मूल्य विचार संवर्धन करण्याचा प्रयत्न निशांतचा असतो, सामाजिक जाणीव ठेवून, वाहनासाठी कर्ज सुवर्णठेव योजना आज सर्व शाखेत सुरू आहे. सर्वसामान्य माणसाला निशांत हे आपले कुटुंब वाटते. शेतकऱ्यांना शेतमालाचे उत्पादन होते, पण त्याच वेळी उत्पादनाचे बाजारातील भाव पडलेले असतात. आर्थिक समस्येमुळे नाईलाजास्तव धान्य विकावे लागते आणि त्या व्यवहारात त्यांचा खूप तोटा होतो. म्हणून धान्याच्या साठवणुकीकरिता, संस्थेने चोहोट्टा आणि खामगाव येथे भव्य असे ६ हजार चौरस फूट स्वतःचे मालकीचे, धान्यसाठा गोदाम बांधलेले आहे. आणि संपूर्ण महाराष्ट्रात जेथे जेथे निशांत शाखा आहे, तेथे भाडेतत्त्वावर गोदाम घेऊन, शेतकऱ्यांचा शेतीमाल गोदामात साठा करून ठेवण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. गोदामात साठवलेल्या मालावर निशांत कर्ज पुरवठा करते. ग्राहकाभिमुख सेवा म्हणजे निशांत असे समीकरणच आज झालेले आहे. भावी काळातील पतसंस्थेच्या योजनेविषयी विचार व्यक्त करताना संस्थापकीय अध्यक्ष, माननीय श्री प्रकाशभाऊ आणि निशांतचे विद्यमान अध्यक्ष श्री. रणधीरभाऊ म्हणतात की, यापुढे रेल्वे, लक्झरी, विमानाचे आरक्षण, टेलिफोन बिल स्वीकृती सुविधा, मोबाईल रिचार्ज, नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड, ट्रान्सफर सुविधा संस्थेच्या वतीने देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

सध्या निशांतची वाटचाल ६०० कोटीकडे सुरू आहे. निशांतच्या प्रगतीसाठी सर्व भागधारक ठेवीदार कर्जदार आणि ग्राहक यांचे अमोल सहकार्य असल्यानेच निशांतची, यशस्वीतेकडे वाटचाल सुरू आहे.

## चळवळ

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे



प्रा.डॉ. इसादास भडके
9096364886
erbfes@gmail.com

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० ला सांगली जिल्ह्यात वाटेगाव येथे झाला. अण्णा भाऊ साठे कम्युनिस्ट चळवळीतून पुढे आले. त्यांनी आपल्या विविधांगी साहित्य कृतीतून बहिष्कृतांचे जीवन चितारले आणि व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले. शाहिरी, गण, गौळण, वगनाट्यं, लोकनाट्य, पोवाडे, लावणी, कथा व कादंबरी या साहित्य प्रकारातून जनसामान्यांचे परिवर्तन कसे होईल हा विचार मांडला. दलित, शोषित, कामगार, शेतकरी, शेतमजूर इत्यादींच्या जीवनातील दैन्य, व्यथा, वेदना आपल्या वाङ्मयातून आविष्कृत केल्या.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी शाहिरी रचनेत आशयाच्या दृष्टीने बदल घडवून आणला. गणेशस्तवनाऐवजी मातृभूमी आणि राष्ट्रपुरुषांना वंदन करण्याची रीत घालून दिली. 'प्रथम मायभूच्या चरणा, छत्रपती शिवचरणा। स्मरोनी गातो कवणा।।' ही नमनातील एक प्रकारे क्रांतीच आहे. शाहिरी वाङ्मयाला त्यांनी कम्युनिस्ट विचारांची जोड देण्याचे भरीव कार्य केले. ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे. ही वास्तववादी विज्ञाननिष्ठ प्रगल्भ जाणीव त्यांनी करून दिली. स्टॅलिनग्राडचा पोवाडा, बर्लिनचा पोवाडा, बंगालची हाक इत्यादी आंतरराष्ट्रीय स्तरावरील, घटनांवरील रचना प्रचंड गाजल्या. भांडवलदार वर्गाकडून होणारे शोषण याविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. 'काळ्या बाजाराचा रोग आला। मागं लागता गोरगरिबाला । सुखाचा घास मिळेना झाला। काळ हा अतिबिकट आला...'

अण्णा भाऊ साठे यांनी शहरातील वास्तव आणि विदारक परिस्थिती शाहिरीतून व्यक्त केले. त्यांची 'मुंबईची लावणी म्हणजे वर्गजाणिवेचे प्रत्यंतर घडविणारी आहे. गरीब आणि श्रीमंत, गगनचुंबी इमारती आणि झोपडपट्ट्या, सुखासीन जीवन आणि अन्नान दशा असा भेदाभेद त्यांनी स्पष्ट केला. 'मुंबईत उंचावरी। मलबार हिल इंद्रपुरी, कुबेराची वस्ती तिथे सुख भोगती। परळात राहणारे।, रात्रंदिवस राबणारे मिळेल ते खाऊन घाम गाळती। फोरास रोड तीन बत्ती गोलपीठा नाक्यावरती, शरीर विकून कितीएक पोट भरती।।'

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची 'माझी मैना गावावर राहिली' ही लोकप्रिय रचना आहे. त्यांनी या लावणीत शोषक भांडवलदाराचे नि गरीब कष्टकरी जनतेचे उपशोधिक चित्रण केले आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी गाव सोडून मुंबईचा रस्ता धरणाऱ्या, पत्नीपासून विलग व्हावे लागणाऱ्या, त्यामुळे भावजीवन कसे विस्कळीत झाले अशा व्यक्तिमत्त्वाची मनोव्यथा त्यांनी शब्दबद्ध केली आहे. 'माझी मैना गावावर राहिली, माझ्या जिवाची होतीया काहिली, ओतीव बांधा। रंग गव्हाळा। कोर चंद्राची, उदात्त गुणाची। मोठ्या मनाची। सीता ती माझी रामाची।।"

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णा भाऊ साठे यांचे भरीव योगदान होते. महाराष्ट्राच्या चळवळीचा सक्षम पोवाडा लिहिला. खंडित महाराष्ट्रामुळेही मनाची कशी तगमग होते याचेही वर्णन ते करतात. त्याच दरम्यान उठली चळवळ संयुक्त महाराष्ट्राची, बेळगाव, कारवार, निपाणी, गोव्यासह एक राज्याची। महाराष्ट्राने गुढी उभारली विजयाची, दाखविली रीत पाठ भिंतीला लावून लढायची' अण्णा भाऊ साठे यांनी पंजाब दिल्लीच्या दंग्याचा पोवाडा लिहिला. त्यात त्यांनी दंगलीचे वास्तव रूप मांडले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता. आंबेडकरी विचार कर्तृत्वाचा गौरव करणारी रचना त्यांनी केली. बाबासाहेबांचा संघर्षाचा विचारच त्यांनी लोकांना सांगितला. त्यांची आंबेडकरांवर अतूट श्रद्धा होती. त्यांनी आपली 'फकिरा' ही कादंबरी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अर्पण केली आहे. हे कशाचे द्योतक म्हणावे? 'जग बदल घालूनी घाव। सांगून गेले मला भीमराव, गुलामगिरीच्या या चिखलात/रूतून बसला का ऐरावत, अंग झाडूनी निघे बाहेरी। घे बिनीवरती धाव। अशी रचना अण्णा भाऊ साठे यांनी केली. गुलामगिरीची मीमांसा केली. एकजुटीशिवाय पर्याय नाही हेही विशद केले. मराठी दलित शाहिरीत अण्णा भाऊ साठे यांनी एक विशेष छाप पाडली असे म्हणताना 'दलित शाहिरी' या ग्रंथात महेंद्र गायकवाड म्हणतात की, 'अण्णा भाऊ साठे यांनी दलित, शोषित, पीडित, जनतेविषयी आस्था बाळगणारे लेखन करून ग्रामीण जीवनाचे, गिरणी कामगाराचे, शेतकरी, शेतमजुराचे स्पष्ट चित्र उभे केले. त्यांनी समाजवादाचा पुरस्कार केला होता. त्यांच्या जीवनातील अनुभव, कटू सत्य, पोवाडा, लावणीतून मांडले. आपल्या पहाडी आवाजाने भांडवलशाही, पुंजीपती, शोषणाविरुद्ध अनेक लढ्याचे सूत्र आपल्या मर्मभेदी गाण्यातून सांगितले. अण्णा भाऊ स्वतः जसे जगले तशाच पेटणाऱ्या रचना लिहिल्या. त्यांनी आपल्या रचनेत माणसाला स्थान दिले. जीवनप्रेम, राष्ट्रप्रेम, समाजप्रेम, उदात्त विचार, स्वाभिमान, चारित्र्यसंपन्न अण्णा भाऊंची लेखणी जीवनाभिमुख झाली, असे क्रांतिकारी विचार सांगणारा अण्णा भाऊ मात्र अखेरपर्यंत उपेक्षित राहिले.

'मुक्ताई' आंबेकर लेआऊट
पाण्याच्या टाकीजवळ, **चंद्रपूर**

## वाचक विचार मंच

### आता ज्येष्ठ नागरिकांची रेल्वे सवलत पूर्ववत करा!


देशातील ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सर्व ज्येष्ठ नागरिकांना त्यांची आर्थिक स्थिती विचारात न घेता आयुष्यमान भारत या योजनेंतर्गत ५ लाखांचा आरोग्य विमा मिळणार असून ५ लाखांपर्यंतचे वैद्यकीय उपचार मोफत मिळणार आहेत. या आरोग्य योजनेचा लाभ देशातील ७० वर्षांवरील सुमारे ६ कोटी ज्येष्ठ नागरिकांना होणार आहे. या अनुषंगाने केंद्र सरकारने नुकताच निर्णय घेतला आहे. त्याबद्धल सरकारचे शतशः आभार.

आता केंद्र सरकारने ज्येष्ठ नागरिकांसाठी रेल्वे तिकिटांमध्ये देण्यात येणारी आणि कोरोना काळात २० मार्च २०२० पासून पूर्णपणे बंद करण्यात आलेली सवलत पुन्हा लागू करावी. खरे तर कोरोनाचा बहर ओसरल्यानंतर भारतीय रेल्वे पूर्ण क्षमतेने रुळावर आली आणि कोरोनापूर्व काळातील भारतीय रेल्वेकडून रेल्वे तिकिटांवर ज्येष्ठ नागरिक वगळता विविध वर्गवारीतील नागरिकांना ज्या विशेष सवलती दिल्या जात होत्या त्या पूर्ववत करण्यात आल्या. एकीकडे लोकप्रतिनिधींच्या विविध सुविधा आणि सवलतींमध्ये वाढ होत असताना ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेली रेल्वे तिकिटांवरची सवलत बंद केल्यामुळे देशभरातील ज्येष्ठ नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

**प्रदीप शंकर मोरे**
मो.नं.:९८७०७७७२७४

## गुल्लेर

# टापटीप पाह्यजे



नरेंद्र इंगळे
9561226572

'नवा सोफा घेतला काय शंकर?'

'कालच घेतला चोवीस हजाराले.'

'सोफा लागतच होता.'

'यावर्षी पोरीचं लगन करा लागते.. चार पावने येतात.. बशा-उठ्याले पाह्यजे.. जुन्या काळात काही चाले.'

'जुन्या काळात काय होतं बे? एक तढव अन् दोन गाद्या टाकल्या की बसा खाली.. माह्याघरी तढव नोता.. मोठ्या घरचा मागून आना लागे.. बेटसीटा नव्हत्या.. गादीले कयकल्या साडीच्या खोया असत. पाटावर बसून पोरगी दाखोत.'

'तुमचं लगन कुठी झालं आप्पा?'

'माहा लगन येतईबुवाच्या देवळावर झालं. बंडीत बसून नवरदेव गेला.. नवरीवाले तिकडून आले. लगन लावलं.. भंडारा केला.. अन् बंडीत बसून नवरी घरी आनली.'

'मोटरा नोत्या काय त्या टाईमले?'

'मोटरा होत्या.. पन गरीबाची औकात नोती.. कुळाच्या घरातला मानूस मोटर सांगीन काय? आता लेकरं कमावते झाले.. नवं घर बांधलं.. पन त्या काळात गोदरीतच जा लागे.'

'आता जमाना बदलला आप्पा.. सगळं टापटीप पाह्यजे... सोयरीकचे पावने पानपुळ्यापासून निरीक्षन करतात. घरच्या वातावरनातून बरताव समजते.'

'अरे माही सोयरिक तापावर झाली. पोरीचा बाप तापावर आंग शेकून राह्यला होता. आमच्या बुढ्यानं तापावर गोठ काढली.. हरबऱ्याचा सिजन होता. बुढ्यानं तापात हरबरे भाजले. दोघाईनं ऊया खाऊन सोयरिक केली.'

'घेन्नवं! आता जमते काय? पावने आले की गरम पोहे करा.. नाश्ता करा.. घट दुधाचा च्या करा.'

'त्या काळात बाया पोह्यात सोप टाकत. कोनी साखऱ्या टाके.. आता निंबू संभार पाह्यजे. निंबू मिठाची प्लेट अलग ठेवा लागते. नाहीतर पावना पोह्यावर निंबू पिवते अन् दारात फोतर फेकते. निशाना चुकला की दुसऱ्याच्या तोंडावर बसते.'

'खरी गोष्ट आहे.. आता पावने जेवाले आले की पतल्या पोया पाह्यजात.. भाजी पद्धशीर पाह्यजे.. वरनावर तूप.. जवसाची अन् तिळाची चटनी.. सलाद..जाळ्या पोया असल्या की पावने बुजाळतात.. पोरीले वळन नाही म्हनतात.. सारा जमाना बदलला बापा.'

### खदखद

पत्रकार परिषदेतून
आधी त्यांना हाकलले
मातोश्रींच्या
विरोधामुळे
म्हणे दूर ढकलले

व्हिडिओ क्लिपमुळे
किंमत झाली शून्य
कमळाकांच्या
नजरेत
ते आहेत अगदी
सामान्य

अपमानाने त्यांचा
जीव अखेर संतापला
मनात ही सल आहे
हेच फळ का मम
तपाला?

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## संवाद

# 'लडाख'च्या मागण्यांबाबत सरकारने विचार करावा!

पाकिस्तान व चीन अनेक कारस्थाने करण्यासाठी या लडाखचा उपयोग करण्याची शक्यता आहे. या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्यास मोठी समस्या निर्माण होऊ शकते. यासाठी केंद्र सरकारने योग्य पावले उचलून वांगचुक यांच्या मागण्यासंबंधी विचार करावा. दोन ऑक्टोबर रोजी या यात्रेचा शेवट दिल्लीमध्ये होणार आहे. त्या अगोदर सरकारने योग्य तो निर्णय घ्यावा.

अभियंता संशोधक, पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी दिनांक १ सप्टेंबरपासून लेहपासून दिल्लीकडे मार्गक्रमण केले आहे. लडाखच्या चार मागण्यांसंदर्भात ते हे आंदोलन करीत आहेत. त्यांच्या चार मागण्या खालीलप्रमाणे आहेत.

१. लडाखला राज्यघटनेप्रमाणे सहाव्या परिशिष्टनुसार दर्जा मिळावा.

२. आदिवासींना घटनात्मक अधिकार मिळावेत.

३. तरुणांना रोजगार मिळावेत यासाठी स्वतंत्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून प्रक्रिया सुरू करावी.

४. लेह व कारगिलसाठी स्वतंत्र लोकसभा मतदार संघांची निर्मिती करावी. या यात्रेत अनेक तरुण व वृद्ध सामील झाले आहेत. यापूर्वी लडाख हा प्रांत जम्मू-काश्मीरपासून वेगळा करून त्यास स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश म्हणून मान्यता देण्यात आली. लडाखमधील आदिवासी समस्या तसेच इतर प्रश्न अतिशय महत्त्वाचे आहेत. लडाख प्रांताचे भौगोलिक स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. पाकिस्तान व चीन अनेक कारस्थाने करण्यासाठी या लडाखचा उपयोग करण्याची शक्यता आहे. या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्यास मोठी समस्या निर्माण होऊ शकते. यासाठी केंद्र सरकारने योग्य पावले उचलून वांगचुक यांच्या मागण्यासंबंधी विचार करावा. दोन ऑक्टोबर रोजी या यात्रेचा शेवट दिल्लीमध्ये होणार आहे. त्या अगोदर सरकारने योग्य तो निर्णय घ्यावा.

**शांताराम वाघ**, पुणे
मो.नं.:+९१ ९६२३४ ५२५ ५३



## ओडिशा सरकारने आरक्षण केले मंजूर
## वयोमर्यादाही शिथिल

# माजी अग्निवीरांना १० टक्के आरक्षण

वृत्तसंस्था

**भुवनेश्वर :** ओडिशा सरकारने राज्यातील माजी अग्निशामकांसाठी १० टक्के आरक्षण मंजूर केले. पोलीस, वन, उत्पादन शुल्क, अग्निसुरक्षा संबंधित सेवांच्या भरतीमध्ये माजी अग्नीवर सैनिकांसाठी हे आरक्षण राज्य सरकारने मंजूर केले आहे. सरकारने शापूरजी पालोनजी पोर्ट मेंटेनन्स प्रायव्हेट लिमिटेड आणि ओडिशा स्टीव्हडोरेस लिमिटेडकडून अदानी पोर्ट्स आणि स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड (एपीएसईझेड) कडे इक्विटी समभाग हस्तांतरित करण्याची परवानगी दिली. मुख्यमंत्री मोहन चरण माळी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंदर्भातील प्रस्तावाला मंजुरी देण्यात आल्याचे मुख्य सचिव मनोज आहुजा यांनी सांगितले. सरकारी कर्मचाऱ्यांच्या अविवाहित आणि सावत्र मुलींना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याच्या प्रस्तावालाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

### शारीरिक कार्यक्षमता चाचणीतूनही सूट

अग्निवीरचे हे आरक्षण संबंधित भरती नियमांनुसार पदांसाठी आवश्यक असलेल्या किमान पात्रतेच्या आधारावर माजी सैनिकांना दिलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त असेल. सुरक्षा संबंधित सेवांच्या गट क आणि डी पदांवर थेट भरती करताना, अग्निवीरला उच्च वयोमर्यादेत तीन वर्षांची सूट देण्यात आली आहे. त्यांना शारीरिक कार्यक्षमता चाचणीतूनही सूट देण्यात आली आहे. मुख्य सचिवांनी पत्रकारांना सांगितले की अदानी पोर्ट्सने यापूर्वी गोपाळपूर बंदरातील ५६ टक्के आणि ओरिसा स्टीव्हडोरेसमधील ३९ टक्के भागभांडवल रिअल इस्टेट समूह शापूरजी पालोनजी ग्रुप (एसपी ग्रुप) कडून खरेदी केले होते. गोपाळपूर बंदर प्रकल्पात अदानी पोर्ट्सचा ९५ टक्के हिस्सा असेल तर ओरिसा स्टीव्हडोरेसचा उर्वरित पाच टक्के हिस्सा असेल.

# भूजल प्रदूषित करणाऱ्यांना होणार १० लाखांपर्यंत दंड

वृत्तसंस्था



**पणजी :** सांडपाणी किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे भूगर्भातील पाणी प्रदूषित करणाऱ्या घटकांना आता १० लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात संमत झालेले भूगर्भ जल नियमन दुरुस्ती विधेयक राज्यपालांच्या स्वाक्षरी नंतर अधिसूचित झाले आहे. यामुळे आता या कायद्याची अंमलबजावणीदेखील झाली आहे.

गोवा भूगर्भ जल नियमन कायदा २००२ च्या कलम १७ मध्ये पावसाळी अधिवेशनात दुरूस्ती करण्यात आली. भूगर्भातील पाण्याची बेकायदा वाहूतक केल्यास ५ ते १० हजार रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद कायद्यात आहे. पहिल्यांदा गुन्हा घडला तर ५ हजार रुपयांचा दंड होणार आहे. पुढील गुन्ह्यासाठी १० हजार रुपयांचा दंड होणार आहे. तसेच सांडपाणी किंवा प्रदूषित पाणी झिरपून भूजल प्रदूषित झाल्यास १० लाखांपर्यंत दंडाची तरतूद सुधारित कायद्यात आहे. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात ६ ऑगस्ट २०२४ रोजी दुरूस्ती विधेयक संमत झाले होते.

# घटनात्मक पदावरील व्यक्तीचा देशाच्या शत्रूंसोबत सहभाग निंदनीय: उपराष्ट्रपती




**नवी दिल्ली :** घटनात्मक पदावरील व्यक्तीचा देशाच्या शत्रूंमध्ये समावेश होणे निंदनीय, घृणास्पद आणि असह्य असल्याचे उपराष्ट्रपती धनखड यांनी म्हटले आहे. संसद भवन संकुलातील राज्यसभा सचिवालयात इंटर्नशिप करणाऱ्या विद्यार्थ्यांना संबोधित करताना धनखड बोलत होते. दरम्यान, ही टीका राहुल गांधी यांना उद्देशून असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर होते. यादरम्यान त्यांनी अनेक आक्षेपार्ह विधाने केलीत. यावेळी राहुल म्हणाले की, पंतप्रधान संविधानावर आघात करत असल्याचे भारतातील कोट्यवधी जनतेला निवडणुकीतून स्पष्टपणे कळले. तसेच त्यांनी शीख समुदायाच्या संदर्भात दिशाभूल करणारी विधाने केली. त्यासोबतच आरक्षण विरोधी वक्तव्य केल्याने राहुल गांधींविरोधात भाजपसह विविध राजकीय पक्षांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. यापार्श्वभूमीवर कुणाचेही नाव न घेता उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी जोरदार टीका केली. धनखड म्हणाले की, महत्त्वाच्या पदांवर असलेल्या काही लोकांना राष्ट्रहिताची माहिती नाही. घटनात्मक पदावर असलेल्या व्यक्तीने देशाच्या शत्रूंशी हातमिळवणी करणे हे निंदनीय, घृणास्पद आणि असह्य असल्याचे उपराष्ट्रपती म्हणाले. तसेच देशाच्या शत्रूंसोबत सामील होण्यापेक्षा निंदनीय, घृणास्पद आणि असह्य दुसरे काहीही असू शकत नाही. अशा लोकांना स्वातंत्र्याची किंमत कळत नाही. या देशाची सभ्यता ५ हजार वर्षे जुनी आहे हे त्यांना समजत नाही. मला दुःख आणि वेदना होत आहेत की काही महत्त्वाच्या पदांवर असलेल्या लोकांना राष्ट्रहिताचे ज्ञान नसल्याची खंत धनखड यांनी व्यक्त केली.

# मॉस्कोत अजित डोवाल-पुतीन भेट
## पुतीनयांचे मोदींबाबत मोठे वक्तव्य





**सेंट पीटर्सबर्ग :** भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी मॉस्कोमध्ये रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. क्रेमलिनने दिलेल्या माहितीनुसार पुतिन यांनी सेंट पीटर्सबर्ग येथे अजित डोवाल यांच्याशी दोन्ही देशांचे परस्पर संबंध, रशिया-युक्रेन युद्ध व सुरक्षेच्या मुद्द्यांवर चर्चा केली. या भेटीवेळी पुतिन यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ब्रिक्स शिखर परिषदेचे निमंत्रण दिले. तसेच पुतिन यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले की ब्रिक्स परिषदेवेळी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी स्वतंत्र द्विपक्षीय चर्चेचे आयोजन करावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिन्याभरापूर्वी रशियाचा दौरा केला होता. मोदी यांनी त्यावेळी पुतिन यांच्याशी रशिया-युक्रेन युद्धासह जागतिक, प्रादेशिक व द्विपक्षीय मुद्द्यांवर चर्चा केली होती. रशियाची शासकीय वृत्तसंस्था तासने दिलेल्या वृत्तानुसार, पुतिन यांनी ब्रिक्स शिखर परिषदेत भारतीय पंतप्रधानांबरोबर द्विपक्षीय बैठक आयोजित करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

# अजानच्या वेळी हिंदूंना पूजा करण्यास बंदी

वृत्तसंस्था

### बांगलादेश सरकारचे फर्मान



**ढाका :** बांगलादेशात सत्तापरिवर्तन झाल्यानंतर हिंदू समुदायांना सातत्याने लक्ष्य केले जात आहे. आता बांगलादेशच्या अंतरिम सरकारने आणखी एक तुघलकी फर्मान जारी केले आहे. त्यानुसार बांगलादेशातील हिंदू यापुढे अजानच्या वेळी पूजा करू शकणार नाहीत. अजान आणि नमाज दरम्यान हिंदू समाजातील लोकांना भजन ऐकण्यास आणि लाऊडस्पीकर वाजवण्यास बंदी असेल. या संदर्भात अंतरिम सरकारचे गृह मंत्रालयाचे सल्लागार आणि निवृत्त लेफ्टनंट जनरल मोहम्मद जहांगीर आलम चौधरी यांनी आदेश जारी केला आहे.

बांगलादेशच्या गृहमंत्रालयाने जारी केलेल्या हिंदूविरोधी आदेशात म्हटले आहे की, जर कोणी या नियमांचे उल्लंघन करताना आढळले तर पोलीस त्याला कोणत्याही वॉरंटशिवाय अटक करतील. दरम्यान, बांगलादेशमध्ये गेल्या १५ वर्षांपासून सरकार चालवत असलेल्या शेख हसिना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्या ठिकाणी मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार स्थापन झाले आहे. युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकार अल्पसंख्याकांच्या सुरक्षेसाठी पावले उचलत असल्याचा दावा केला होता, पण आता अंतरिम सरकारने आता तुघलकी फर्मान जारी केले आहे. बांगलादेशात सत्ताबदल झाल्यापासून ३०० हिंदू कुटुंबे आणि त्यांच्या घरांवर हल्ले झाले आहेत. याशिवाय हिंदूंच्या बाबत मॉब लिंचिंगच्या चार मोठ्या घटना घडल्या आहेत. १० हून अधिक हिंदू मंदिरांमध्ये तोडफोड आणि जाळपोळ करण्यात आली आहे.

## पेरूचे माजी राष्ट्रपती अल्बर्टो फुजिमोरी कालवश

**लिमा :** पेरूचे माजी राष्ट्रपती अल्बर्टो फुजिमोरी यांचे वयाच्या ८६ व्या वर्षी गुरुवारी निधन झाले. त्यांना कर्करोग झाला होता. बुधवारी त्यांच्या मृत्यूची घोषणा त्यांची मुलगी केको फुजिमोरी यांनी इन्स्टाग्रामवरील पोस्टद्वारे केली. ते २०२६ मध्ये होणारी राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढवण्याचा विचार करत असल्याची माहिती त्यांच्या मुलीने जुलै २०२४ मध्ये दिली होती. ते चालू वर्षाच्या प्रारंभापर्यंत तंदुरुस्त होते. मात्र, कर्करोगाने ग्रासल्याने गेल्या काही दिवसांमध्ये त्यांची प्रकृती फारच नाजूक झाली होती. अखेरीस गुरुवारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

## उद्योगांना त्रास देऊन काय साध्य करू इच्छिता?
### आमदार आदित्य ठाकरेंचा सवाल

**मुंबई :** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी नुकतीच पुण्यातील 'मर्सिडीज बेंझ' कंपनीला भेट दिली होती. यावेळी त्यांनी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाबाबत आक्षेप नोंदवत कारवाईचा बडगा उगारला होता. याप्रकरणी तसेच इतर विषयावर पत्रकार परिषद घेत ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला.

आदित्य ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्रातून आधीच मोठमोठे उद्योग बाहेर जात असताना, जे उद्योग इथे वर्षानुवर्षे आहेत, ज्यांच्यामुळे हजारो-लाखो तरुणांना रोजगार मिळाले आहेत, त्या उद्योगांना त्रास देऊन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ काय साध्य करू इच्छित आहे? असा संतप्त सवाल करत याप्रकरणी एमपीसीबीला पत्र लिहिले आहे. या पत्रातून मर्सिडीझ बेंझने पर्यावरणाचा नेमका कसा ऱ्हास केला आहे? त्यांनी नेमके काय केले आहे? असे प्रश्न मी त्यांना विचारले आहेत. तसेच सिद्धेश कदम यांनी कंपनीला निव्वळ भेट दिली होती की ती धाड होती? त्यांच्यावर नेमका किती दंड आकारण्यात आला आहे? असेही विचारले आहे. याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्पष्टीकरण देणे आवश्यक असल्याचेही आदित्य ठाकरे म्हणाले. केंद्र सरकारवर टीका करताना आदित्य ठाकरे म्हणाले की, लोकांच्या डोळ्यात सरकारने धूळ फेक केली आहे.



**मुंबई :** गणेशोत्सव व गौरी हा सर्वांचाच आवडता सण. त्याच्या आगमनाची लगबग खूप आधीपासूनच सुरुवात होते. बाप्पा जवळचा असल्याने त्याला निरोप देताना भक्तांचे मन भरून येते. गुरुवारी गौरी-गणपतींचे विसर्जन झाले. माहेरवाशीण गौरीला निरोप देतानाही भक्त भावुक झाले होते.

## मुडाप्रकरणी सिद्धरामय्यांच्या याचिकेवरील निकाल ठेवला राखून

**बेंगळूर :** म्हैसूर नगरविकास प्राधिकरणाच्या भूखंड वाटप प्रकरणी राज्यपालांनी खटला चालविण्यास दिलेल्या परवानगीविरुद्ध मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवरील सुनावणी पूर्ण करून उच्च न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. तसेच मुख्यमंत्र्यांविरुद्ध चौकशीला आदेश देण्याची मागणी करत विशेष न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेवरील प्रक्रियेला दिलेली स्थगिती उच्च न्यायालयाने पुढील आदेशापर्यंत कायम ठेवली आहे.

### निकालापर्यंत मुख्यमंत्र्यांना दिलासा

त्यामुळे न्यायालय केव्हा आणि काय निकाल देईल, याविषयी राजकीय वर्तुळात कुतूहल निर्माण झाले आहे. न्यायामूर्ती एम. नागप्रसन्न यांच्या पीठासमोर सिद्धरामय्यांच्या याचिकेवर पुढील सुनावणी झाली. मुख्यमंत्र्यांच्यावतीने ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी, प्रा. रवीवर्मा कुमार यांनी दीर्घ युक्तिवाद केला. राज्यपालांच्यावतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, तक्रारदारांच्यावतीने ज्येष्ठ वकील के. जी. राघवन यांनी युक्तिवाद केला.

# खोट्या आणि षड्यंत्रांविरुद्धच्या लढाईत सत्याचा विजय

**नवी दिल्ली:** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अबकारी धोरण प्रकरणात जामीन मिळाल्याने माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी आनंद व्यक्त केला आहे. त्यांनी एक्सवर पोस्ट करत प्रतिक्रिया दिली आहे. आज पुन्हा खोट्या आणि षडयंत्रांविरुद्धच्या लढाईत सत्याचा विजय झाला आहे. बाबासाहेब आंबेडकरजी यांच्या विचारसरणीला आणि दूरदृष्टीला मी पुन्हा एकदा सलाम करतो, ज्यांनी ७५ वर्षांपूर्वी सामान्य माणसाला भविष्यातील कोणत्याही हुकूमशहाविरुद्ध बळ दिले होते. असेही ते म्हणाले आहे सत्यमेव जयते - सत्याच्या शक्तीने हुकूमशहाच्या तुरुंगाचे कुलूप तोडले होते. असे म्हणत त्यांनी मोदी सरकारवर टीका केली आहे.

दरम्यान, आम आदमी पार्टी (आप) नेँ वर व्हिडिओ शेअर केला आहे. दिल्ली अबकारी धोरण प्रकरणी ईडीने अरविंद केजरीवाल यांना २१ मार्च रोजी अटक केली होती. यानंतर त्यांना २१ दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला. त्याने पुन्हा शरणागती पत्करली. नंतर त्यांना ईडी प्रकरणात जामीन मिळाला.

# सोनोबॉयमुळे समुद्रात भारताची ताकद वाढली

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** भारतीय नौसेनेची आता मोठ्या प्रमाणात ताकद वाढणार आहे, कारण लवकरच अमेरिका भारताला हाय अल्टिट्यूड अँटी-सबमरीन वॉरफेअर 'सोनोबॉय' पुरवणार आहे. यासाठी ₹५२.८ दशलक्ष किमतीचा करार दोन्ही देशांमध्ये करण्यात आला आहे. आयएनएस मालप आणि आयएनएस मुल्की या पाणबुडीनाशक युद्धनौका यापूर्वीच भारतीय नौदलात दाखल झाल्या आहेत. यामुळे आता भारतीय लष्कराची ताकद वाढणार आहे.

यामुळे समुद्रातील भारताची टेहाळणी आणखी मजबूत होईल.

सोनोबॉयची सर्वात खास गोष्ट म्हणजे ते पाणबुडी, युद्धनौका आणि हेलिकॉप्टरमधून प्रक्षेपित केले जाऊ शकते. समुद्रातील शूत्रची सर्व माहिती सोनोबॉय देणार आहे. त्यामुळे नौदलाला अपडेट राहण्यास मदत मिळणार आहे. तीन फूट लांब सोनोबॉयची सोनार प्रणाली हे त्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. त्याच्या मदतीने ते पाण्याच्या खोलीत असलेल्या शत्रूच्या पाणबुड्या शोधू शकतो.

### सोनोबॉय दोन प्रकारे काम करते

सोनोबॉय दोन प्रकारे काम करते. सक्रिय आणि निष्क्रिय. निष्क्रिया मोडमध्ये त्याचा वापर करताना वस्तूचे अंतर आणि दिशा शोधली जाते तर सक्रिय मोड म्हणजे समोरून येणाऱ्या ध्वनी लहरी शोधणे आहे. त्यात पाणबुडी किंवा इतर वस्तू शोधल्या जातात. सोनोबॉय पाणबुडी, हेलिकॉप्टर आणि युद्धनौकांमधून सोडला जाऊ शकतो. याद्वारे भारतीय नौदलाची पाणबुडीविरोधी युद्ध करण्याची क्षमता सुधारणार आहे. सोनोबॉयमुळे चीन आणि पाकिस्तानला मोठा धक्का बसणार आहे.

### अमेरिका देणार सोनोबॉय



शत्रूच्या पाणबुड्या किंवा कोणत्याही हालचालींना आळा घालण्यास मदत होणार आहे.

# श्रीलंकेच्या निवडणुकीत दिसनायकेंचे पारडे जड!
## चार उमेदवारांमध्ये मुख्य लढत

**कोलंबो :** श्रीलंकेत २१ सप्टेंबर रोजी होणाऱ्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी १० दिवसांपेक्षाही कमी कालावधी राहिला आहे. या वेळेस ३८ पेक्षा जास्त उमेदवार राष्ट्राध्यक्षपदाच्या स्पर्धेत आहेत. मात्र, मुख्य लढत ४ उमेदवारांमध्ये आहे. यामध्ये नॅशनल पीपल्स पॉवरचे(एनपीपी) अनुरा कुमारा दिसनायके, समागी जन बालवेगयाचे (एसजेबी) विरोधी पक्षनेते साजिथ प्रेमदासा एक स्वतंत्र उमेदवाराच्या रूपात लढत आहेत. राष्ट्राध्यक्ष रानिल विक्रमसिंघे आणि



माजी राष्ट्राध्यक्ष महिंदा राजपक्षे यांचे पुत्र नमल मैदानात आहेत. आतापर्यंतच्या अंदाजानुसार, या वेळच्या निवडणुकीत ५ वर्षांपूर्वी स्थापन नॅशनल पीपल्स पॉवरचे (एनपीपी) पारडे जड आहे आणि अनेक लोकांना आशा आहे की, ५५ वर्षीय अनुरा कुमारा दिसनायके श्रीलंकेचे ९ वे राष्ट्राध्यक्ष होऊ शकतात.

# ४ वर्षांत बायडेन यांनी घेतली ५३२ दिवस सुट्टी
## ४० टक्के वेळ गेला सुट्ट्यात

वृत्तसंस्था...

**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या नव्या अध्यक्षांची लवकरच निवड केली जाणार आहे. विद्यमान अध्यक्ष जो बायडेन यांनी निवडणुकीतून माघार घेत उमेदवारीसाठी कमला हॅरिस यांचे नाव पुढे केले होते. बायडेन यांचे वय आणि प्रकृती पाहता ते राजकारणातून आता निवृत्त होणार हे निश्चित. तथापि, बायडेन यांच्या संदर्भातील विविध बाबीही आता प्रकाशात येऊ लागल्या आहेत. त्यातली अशीच एक समोर आलेली माहिती म्हणजे



आपल्या चार वर्षांच्या कार्यकाळात बायडेन यांनी ५३२ दिवस सुट्टी घेतली होती. विशेष म्हणजे या सर्व अधिकृत सुट्ट्या होत्या. तसेच असेही म्हटले जाते आहे की एक सामान्य अमेरिकी नागरिक आपल्या ४८ वर्षांच्या सेवाकाळात जेवढ्या सुट्ट्या घेतो तेवढ्या सुट्ट्या बायडेन यांनी चारच वर्षांत घेतल्या आहेत.


# एआयने सुचवलेली रेसिपी झाली हिट!

वृत्तसंस्था

**दुबई :** दुबईमध्ये असलेल्या डिलिव्हरी चेन डोडो पिझ्झाचे मेन्यू डेव्हलपमेंट हेड स्पार्तक अरुतयुनयान यांनी चॅट जीपीटीला सर्वोत्तम पिझ्झाची रेसिपी तयार करायला सांगितली. त्याने रेसिपी तयार केली. ती लॉंच झाली आणि लोकप्रिय झाली आता हा पिझ्झा डिलिव्हरी चेन डोडो पिझ्झाच्या नियमित मेन्यूचा भाग आहे.

दुबईची लोकसंख्या तीस लाखांच्या घरात आहे. त्यातील ९० टक्के लोक बाहेरून आलेले आहेत. जगभरातले वेगवेगळ्या

### पिझ्झा लॉंच करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर



संस्कृतीचे लोक आहेत. त्यात भारतीय, पाकिस्तानी, फिलिपिन्स, अरब आणि युरोपातील लोकांचा समावेश आहे. शहरातील सांस्कृतिक विविधता लक्षात घेऊन स्पार्तक यांनी चॅट जीपीटीला पिझ्झाची रेसिपी तयार करायला सांगितली होती.

# विद्यार्थ्याच्या एका चॉकलेटने प्रिन्सिपॉलची नोकरी गेली!
## सेवेच्या नियमांच्या विरुद्ध वागणूक

वृत्तसंस्था

**बीजिंग :** चीनमधील वॉन्गक्विंग येथील प्रिन्सिपॉलने विद्यार्थ्याकडून चॉकलेट घेतल्याने त्यांची नोकरी गेली आहे. मॉंटेसरीचे प्रिन्सिपॉल वांग यांना आलेला अनुभव सर्वांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. यंदाच्या शिक्षकदिनी या मॉंटेसरीतील एका विद्यार्थ्याने वांग यांना आपुलकीने भेट म्हणून ६० रुपयांचे एक चॉकलेट दिले. विद्यार्थ्याने एवढ्या प्रेमाने दिलेले हे चॉकलेट त्यांनी खाल्ले. मात्र, ही कृती करून आपण सरकारच्या नियमाचा भंग केला आहे याची जाणीव त्यांना त्यावेळी झाली नाही. हे चॉकलेट त्यांनी एकट्यानेच खाल्ले असेही नाही. त्यांनी ते मॉंटेसरीतील इतर मुलांनाही वाटले होते. या प्रसंगानंतर काही दिवसांनी त्यांना सरकारची नोटीस आली. त्यांना नोकरीवरून काढून टाकण्यात येत आहे, असा मजकूर त्या नोटिसीत पाहून त्यांच्या डोळ्यासमोर अंधेरी आली. आपण विद्यार्थ्याकडून भेटवस्तू स्वीकारली आहे.

# अंभोरा पोलिसांचा अवैध धंद्यावाल्यांना दणका!

**वेलडन** सात महिन्यात सपोनि मंगेश साळवेंच्या ५५ कारवाया

प्रा. शुभम जैन/ कडा

सामाजिक सलोखा कायम ठेवून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी. खाकी वर्दीचा धाक काय असतो. हेच अवघ्या सात महिन्यात अंभोरा पोलीस ठाण्याचे सपोनि मंगेश साळवे यांनी अवैद्य धंद्यावाल्यांना दाखवून दिले. खतरनाक गुन्हेगारांच्या बेधडक मुसक्या आवळून अवैद्य धंद्यासह जुगारीच्या तब्बल ५५ कारवाया केल्या आहेत. ऑगष्ट २०२४ अखेरपर्यंत गत वर्षाच्या तुलनेत १३८ केसेस दाखल करुन ५५ गुन्ह्यात १७ लाख १४ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन अल्पकाळात पोलीस दलात नावलौकिक प्राप्त केला आहे.




आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस ठाण्यांतर्गत लहान- मोठी एकूण ८३ गावे तर तीन लाखाच्या जवळपास लोकसंख्या आहे. या एवढ्या मोठ्या गावांच्या दिमतीला केवळ एका अधिका-यांसह २६ पोलीस कर्मचारी आहेत. या पोलीस ठाण्यात त्या तुलनेत अपूरे पोलीस बळ असतानाही सपोनि मंगेश साळवे व त्यांचे कर्मचारी सामाजिक स्वास्थ व कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यात यशस्वी ठरले आहेत. सपोनि साळवे यांनी अंभोरा ठाण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या सात महिन्यात हद्दीतील चो-या, अवैद्य धंद्यांना आळा घातला. स्वत:चा जीव धोक्यात घालून खतरनाक गुन्हेगारांच्या मुसक्या आवळून अनेकांना गजाआड करण्याची किमया साधली म्हणावी लागेल. त्यामुळे या हद्दीतील अवैद्य धंद्यावाल्यानी खाकी वर्दीचा धसका घेतला आहे. सपोनि साळवे यांनी पदभार घेतल्यापासून सर्वसामान्य माणसांना पोलीस एक मित्र म्हणून न्याय देण्याची भूमिका बजावली. अवघ्या सात महिन्याच्या कार्यकाळात अवैध दारूसह जुगारीच्या ५५ कारवाया केल्या. गुन्हेगारी, टगेगिरीला चाप बसावा. याकरिता प्रतिबंधात्मक कारवाया करण्याची मोहीम कायम ठेवून ऑगस्ट २०२४ अखेर पर्यंत मागील वर्षाच्या तुलनेत १३८ केसेस जास्त केलेल्या आहे. तर ५५ गुन्ह्यात १७ लाख १४ हजार ९२० रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. सामान्य नागरिकांसह विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळा, महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन नवीन पान २ वर...

### अंभोरा पोलिसांचा स्तुत्य उपक्रम!

शाळा, महाविद्यालय परिसरात मुलींची होणारी छेडछाड, टगेगिरीला आळा बसावा, म्हणून पोलीस काका, पोलीस दीदी हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. विविध शाळांमध्ये विद्यार्थींच्या समस्या जाणून घेण्याकरिता तक्रारपेटी बसविण्याबाबत पोलिसांकडून शाळा प्रशासनाला सुचित करण्यात आले. तसेच चो-या, दिवसा होणा-या घरफोडीच्या घटना घडू नयेत. म्हणून प्रत्येक गावांना भेटी देऊन पोलिसांनी नागरीकांत जनजागृती करुन त्या संदर्भात घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन करण्याची स्तुत्य मोहिम राबविण्यात येत असल्याने नागरीकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# शाळा,विद्यालयात सुविधांचा अभाव!

**अॅड.नारायण गोले:**माजलगाव प्रशासनास निवेदन



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी तालुक्यातील सर्वच शाळात विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रलंबित असून शाळा आणि विद्यालयात स्वच्छतागृहाचा अभाव आहे त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना पोटाचे विकार जडत असून विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, एका बाजूला शासन कोट्यावधी रुपयांच्या जाहिराती करत असताना दुसऱ्या बाजूला शाळेत पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतागृहाची व्यवस्था दिसून येत नाही ही बाब गांभीर्यपूर्वक विचार करण्यासारखे असून विद्यार्थ्यांचे भवितव्य शाळेत दडलेले असल्याने शाळेसाठी व विद्यालया साठी शिक्षण विभागाने पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांच्या मूलभूत प्रश्नावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे तरी विद्यार्थ्यांची होणारी हेळसांड थांबवून शाळेत पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहाची व्यवस्था करा अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी गटशिक्षणाधिकारी श्री महामुनी यांच्याकडे १३ सप्टेंबर रोजी निवेदनाद्वारे केली असून सदर निवेदनावर तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ, तालुका सह चिटणीस भाई राहुल सोळंके, सह चिटणीस भाई सतीश शेजुळ, पुरोगामी युवक संघटनेच्या तालुका अध्यक्ष भाई अशोक कुलकर्णी, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका चिटणीस भाई अनंत चव्हाण, ज्येष्ठ नेते भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, गोविंद आढाव,भरत सोळंके, अभिषेक सोळंके,कृष्णा आसाराम सोळंके,सुशिल हांडे, नुमान भाई चाऊस, संभाजी पाष्टे, भाई माऊली चंदनशिव भाई सुदाम चव्हाण, भाई उल्हास घाटूळ, भाई चांगदेव शेजुळ, भाई भास्कर कांबळे, भाई राजेभाऊ शेरकर, संभाजी चव्हाण आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# साळेगाव आरोग्य केंद्र योग्य ठिकाणी बांधा !

**मागणी:** तहसीलदार यांना निवेदन

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे साळेगाव येथील बाजार तळावरील असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राची योग्य ठिकाणी स्थलांतर करून नवीन रुग्णालय इमारत बांधून देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीने दि. १३ सप्टेंबर २०२४ रोजी तहसीलदार यांना निवेदन दिले आहे. सविस्तर बातमी असे की, साळेगाव मुख्य बाजार तळाठिकाणी ग्रामपंचायत ने रुग्णालयासाठी जागा दिलेली आहे. तसेच काही अंतरावर संत भगवान बाबाचे मंदिर आहे. मंदिर काही २० ते ३० फुटाच्या अंतरावर असून तेथे घाणीचे साम्राज्य असल्याने तिथे आरोग्यासाठी धोका आहे. तसेच सामाजिक भावना दुखावल्या जात आहेत. तरी हा दवाखाना इतर ठिकाणी स्थलांतर करण्यात यावा. वंचित बहुजन आघाडीचा या दवाखाण्यास विरोध नसून तिथे होत असल्याने घाणीमुळे आरोग्य धोक्यात पान २ वर...




# राजकीय नेत्यांच्या भेटीची बातमी तथ्यहीन

**डॉ. ज्योती मेटे:**प्रसार माध्यमातून दिले स्पष्टीकरण

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी महाराष्ट्रभर वाढवलेली आणि रुजवलेली शिवसंग्राम बळकट करण्यासाठी गेली पंधरा दिवस राज्यातील शिवसंग्रामच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या बैठका ,गाठीभेटी मुंबई येथे सुरू आहेत. त्याचबरोबर लोकनेते विनायकराव मेटे साहेब मुंबईतील ज्या गणेश मंडळांना प्रतिवर्षी भेट द्यायचे त्या मंडळाच्या आग्रहास्तव रायगड, पेण, दिंडोशी , भिवंडी व मुंबई परिसरातील गणेश मंडळांना नियोजित भेटी दिल्या हे सर्व नियोजित कार्यक्रम सुरू असताना काही प्रसार माध्यमातून विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मी काही राजकीयपुढार् यांच्या भेट घेतल्या असल्याची तथ्यहीन बातमी प्रसार माध्यमातून पुढे आली वास्तविक पाहता असल्या पान २ वर...



# बीडमध्ये ताकदीने शक्ती प्रदर्शन करा

**पप्पु कागदे :** माजलगावामध्ये रिपाइंची बैठक

माजलगाव/प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले शोषित, वंचित, उपेक्षित समूहातील समाज बांधवांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी राज्यसह देशभर रिपाइंच्या माध्यमातून त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी विविध आंदोलनाच्या माध्यमातून संघर्ष करीत आहेत.

संघर्षशील व कर्तव्यदक्ष नेतृत्वाचा यथोचित सन्मान करण्यासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने दि.५ ऑक्टोबर रोजी बीड शहरात केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची तिसऱ्यांदा केंद्रीय मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल भव्य नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे. या भव्य नागरिक सत्कार सोहळ्याच्या पूर्वतयारीसाठी आयोजित माजलगाव तालुका कार्यकारिणीच्या बैठकीत युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइं बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी रिपाइं कार्यकर्त्यांनी न्याय व हक्कासाठी संघटीत होऊन ताकतीने शक्तिप्रदर्शन करावे असे आवाहन केले.

यावेळी राजू जोगदंड, अविनाश जावळे,भगवान ससाने, प्रभाकर चांदणे, किशोर जावळे,राजू पान २ वर...



# म्हणून उपोषण करण्याची वेळ!

**बोंबला:**खाते होल्ड केल्याने योजनांचा लाभ मिळेना



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत मनमानी कारभार सुरू असल्याने सर्वसामान्य माणूस त्रस्त झाले आहेत कारण महाराष्ट्र ग्रामीण बँके खाते दाराचे खाते होल्ड केल्यामुळे खाते दाराच्या खात्यात जमा झालेली रक्कम पीकविमा किसानचे रक्कम , रिटायर कर्मचारी पगार, पीऐम किसान पागार रक्कम मिळत नसल्याने गणेश लाड २५/०९/२०२४ पासुन अमरण उपोषणाला बसणार आहेत असे निवेदनाद्वारे म्हटले आहे या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे

की होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेने शेतकऱ्यांचे खाते होल्ड केल्यामुळे आम्हा शेतकऱ्यांना शासनाना कडुन मिळणाऱ्या पान २ वर...

# राष्ट्रवादी पदाची सोपवली जबाबदारी

**निवड:** केज शहराध्यक्षपदी सद्दाम खतीब

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज - राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार गट) केज शहर अध्यक्ष पदी सद्दाम (शद्दु) खतीब यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खासदार बजरंग बाप्पा सोनावणे यांनी त्यांची निवड केली अंबाजोगाई येथे कार्यकर्ता मेळाव्यामध्ये माजी आमदार पृथ्वीराज साठे, ज्येष्ठ नेते बबन जाधव राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष शंकर जाधव, यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये शद्दु खतीब यांना निवडीचे पत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. मा. खासदार बजरंग बाप्पा यांच्याशी एकनिष्ठता आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांमधला जनसंपर्क यामुळे त्यांच्यावर आता शहर अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. बजरंग बप्पा सोनवणे प्रतिष्ठान, छत्रपती अंगरक्षक इब्राहिम खान प्रतिष्ठान व अल सफा वेल्फेअर सोसायटी च्या माध्यमातून सामाजिक, संस्कृति व क्रीडा क्षेत्रामध्ये उल्लेखनीय असे काम केलेले आहेत.

आगामी काळात पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी आणि अधिकाधिकी तरुणांना राष्ट्रवादीच्या (शरद पवार गट) प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सद्दाम (शद्दु) खतीब यांनी सांगितले. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या विचार धारेशी एकरूप राहून माननीय खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांना आदर्श स्थानी मानून पक्ष श्रेष्ठींनी ठेवलेला विश्वास सार्थ ठरवून दाखवेल असं देखील सद्दाम (शद्दु) खतीब यावेळी म्हंटले आहे. पान २ वर...



# परळीमध्ये गणपती सजावट स्पर्धा!

**आवाहन:** पिनाकी फाउंडेशनचा उपक्रम

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या जेष्ठनेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली पिनाकी फाउंडेशनचे संस्थापक तथा युवा उद्योजक सुनिल गुट्टे आयोजित परळी मतदार संघातील गणेशोत्सव मंडळासाठी गणपती सजावट स्पर्धा आयोजित केली आहे.

समृद्धीचा सोहळा, संस्कृतीचा गौरव, सांस्कृतिक परंपरेचा महोत्सवात गणेशोत्सव मंडळासाठी गणपती सजावट स्पर्धा मध्ये सहभागी होण्यासाठी ७८२२८३२५८३ / ८७८८३४५८५० यानंबरच्या वाटसपवर गावाचे नाव, मंडळाचे नाव, मंडळ अध्यक्षाचे नाव, संपर्क क्रमांक, खाली दिलेल्या व्हाट्सअॅप क्रमांकावर पाठवावी. तसेच व्यवस्थित २ फोटो व ६० सेकंद पर्यंत व्हिडिओ पाठविणाऱ्या स्पर्धकांचा विचार केला जाणार आहे.हि स्पर्धा परळी मतदारसंघातील जिल्हा परिषद सर्कल नुसार घेण्यात येत आहेत. विजयी मंडळाला ११००१रुपये प्रथम क्रमांकाचे बक्षीस तर द्वितीय क्रमांक येणाऱ्या मंडळाला ७००१ रुपये याचे बक्षीस देण्यात येणार आहे.स्पर्धेत सहभागासाठी चा कालावधी ९ सप्टेंबर ते ११ सप्टेंबर दरम्यान असणार आहे.चला तर समृद्धीचा सोहळा, संस्कृतीचा गौरव, सांस्कृतिक परंपरेचा महोत्सव अंतर्गत गणेशोत्सव पान २ वर...

**जगताप, मुळूक** आरक्षणविरोधी राहुल गांधींचा निषेध

# शिवसेनेच्या वतीने जोडे मारो आंदोलन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आरक्षणविरोधी वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ आज शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या नेतृत्वाखाली बीड शिवसेनेच्या वतीने आज दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील जालना रोड येथे असलेल्या शिवसेना मध्यवर्ती कार्यालयासमोर राहुल गांधींविरुद्ध जोडे मारो आंदोलन केले. भारतीय संविधानाचा अपमान करणारे राहुल गांधी मुर्दाबाद, राहुल गांधी माफी मांगो, काँग्रेस मुर्दाबाद, असे नारे देऊन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्यासह शिवसेनेच्या उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी राहुल गांधी यांच्या प्रतिमेला जोडे मारले.




लोकसभा निवडणुकीआधी जातनिहाय जनगणना, आदिवासी, दलित जनतेबद्दल कळवळा दाखविणाऱ्या काँग्रेसची सामाजिक न्यायासंदर्भातली भूमिका किती दुटप्पी आहे, हे राहुल गांधी यांच्या अमेरिकेतील वक्तव्यातून स्पष्ट झाले आहे. काँग्रेसने कायम लोकशाही व संविधानाची पायमल्ली केली असून आता काँग्रेसची मजल आरक्षण रद्द करण्याची इच्छा व्यक्त करण्यापर्यंत गेली आहे. वारंवार विदेशात जाऊन भारताची बदनामी करण्याचे काम हे राहुल गांधी करत आहे. पान २ वर...

# पत्रकार संघाकडून हल्ल्याचा निषेध!

**संतप्त:** दयानंद सोनवणे यांच्यावर झाला होता हल्ला

पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी

अवैध धंद्याची बातमी छापल्यामुळे दैनिक लोकनायकचे पत्रकार दयानंद सोनवणे यांना झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ पाटोदा तहसीलला पाटोदा तालुक्यातील पत्रकार बांधव यांनी निवेदन देऊन या घटनेचा निषेध करण्यात आला. याबाबत सविस्तर वृत्त असे की पाटोदा तालुक्यातील अंमळनेर पोलिसांच्या कार्यक्षेत्रातील अवैध दारु विक्री,सपोर्ट, पत्त्यांचा क्लब,मटका आदी अवैध धंद्याची बातमी दैनिक लोकनायकचे पत्रकार दयानंद सोनवणे यांनी दैनिक लोकनायक च्या दि ९ सप्टेंबर च्या अंकात छापली होती.या अवैध धंद्याची झळ तरुणाईला,व महिला वर्गाला बसत आहे.तरुणाई व्यसनाधीन व जुगारी होत आहे तसेच उसतोडणी मजुरांची आगाऊ उचलही या व्यसनात जात आहे.ही सामाजिक भावना लक्षात घेऊन अंमळनेर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले होते.याचा राग धरुन पोलीसांचा हफ्ता गोळा करणारा एजंट व अवैध दारु विक्री व पत्त्याचा जुगार सर्रासपणे चालवणारे तुकाराम आतकरे व अशोक वाल्हेकर यांनी रात्री डोंगरकिन्ही ते मिसाळ वाडी रोडवर गाठुन अश्लिल भाषेत शिविगाळ करुन खाली पाडुन लाथा बुक्यांनी जबर मारहाण केली पान २ वर...

